22602

BVBK-0402272

वाचनालय पा.वा.

२२५२
२२।७।८८


म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

[illegible]

क्र. २२५२ दि: २२।७।८८

विषय पा.वा. .... रु. ........

हा शोध भारताचा : ८



सुवर्णयुगाचा उषःकाल

BVBK-0402272

# सुवर्णयुगाचा उषःकाल

गुप्तकालात या भूमीवर सुवर्णवैभव अवतरले

राजा मंगळवेढेकर

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७ नारायण पेठ,
दै ' प्रभातसमोर ' पुणे - ३०
फोनं - ४४९५४१.

© राजा मंगळवेढेकर
प्रकाशन दिनांक - १५ ऑगस्ट १९८८
(                    ) दुसरी आवृत्ती

मुद्रक - प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथपाराजवळ,
पुणे - ३०.

मूल्य - १००/- रूपये
१० पुस्तकांचा संच

भारत !

पाच सहस्र वर्षांचा स्फूर्तिदायक इतिहास
अभिमानाने सांगणारा हा पृथ्वीच्या पाठीवरला
प्राचीन, विशाल देश !

अनेक मानवसमूह या भूमीवर आले, वसले, नांदले.
अनेक राज्ये-साम्राज्ये उदयाला आली नि मावळली.
विविध संस्कृती, धर्म, पंथ...
विविध साहित्य, संगीत, शिल्प....
विविध शास्त्र, विज्ञान, कला...
किती तरी गोष्टींतून भारताच्या
अस्मितेची जडण-घडण झाली.
एक विदग्ध, सहिष्णू, विजिगीषू
व नित्यनूतन अशी संस्कृतीही
आकारास आली.

अर्वाचीन भारत
अशा गौरवसंपन्न प्राचीन भारताच्या
मजबूत खांद्यावरच उभा आहे.
आणि त्याच प्राचीन भारताच्या
सांस्कृतिक धडपडीचा हा
एक विनम्र शोध !

# अनुक्रम


| | |
|---|---|
| सुवर्णयुगाचा उष:काल | ५ |
| 'पराक्रमांक' समुद्रगुप्त | ९ |
| भारतीय नेपोलियन | २० |
| अश्वमेध | २७ |
| रामगुप्त | ३१ |
| चंद्रगुप्त–विक्रमादित्य | ३५ |
| फाहियानचे प्रवासवर्णन | ४८ |
| कविकुलगुरू कालिदास | ५९ |
| वैभवशाली काल | ६७ |



# सुवर्णयुगाचा उषःकाल

राज्य, साम्राज्य, राजे, महाराजे, राजवंश, राज्यप्रणाली इत्यादींना जसे उदय आणि अस्त आहेत, तसेच इतिहासाच्या चक्रात राजनगरीच्या नशिबीही ऊन-सावलीचे खेळ असावेत. ज्या पाटलीपुत्र राजनगरीचा वैभव-सूर्य नंद साम्राज्यापासून ते कुशाण साम्राज्यापर्यंत तळपत राहिला होता तो त्यानंतरच्या काही कालापुरता का होईना, पण निस्तेज बनला होता. ज्या पाटलीपुत्र राजनगरीचे आकर्षण सिकंदराला वाटले होते, डेमेस्ट्रेनिअस व मिनॅण्डर यांना वाटले होते, ती नगरी काही काळ का होईना पण प्रभावहीन बनलेली होती. ज्या पाटलीपुत्र नगरीचा दरारा सर्व भारतालाच नव्हे तर भारताबाहेरील देशांना व आक्रमकांनाही वाटत होता, तो काही काळ का होईना, पण विरून गेल्यासारखा झाला होता. परंतु हे वैभवहीन दिवसही पाटलीपुत्र राजनगरीला फार काळ पहावे लागले नाहीत. लवकरच एक नव्या राजवंशाचा उदय झाला आणि त्याबरोबरच पाटलीपुत्र राज-

नगरीचाही भाग्यसूर्य पुनःश्च गौरवाने तळपू लागला.

तिसऱ्या शताब्दीच्या अखेरीस आणि चौथ्या शताब्दीच्या प्रारंभी या काळात उत्तर भारतामध्ये सार्वभौम सत्तेचा अस्त झालेला होता आणि त्यामुळेच ठिकठिकाणी लहान-मोठी अशी कितीतरी राज्ये अस्तित्वात आलेली होती. कितीतरी राज्ये आणि गणराज्ये स्वतंत्र झालेली होती. अशांती, अव्यवस्था आणि अराजकता यांचेच साम्राज्य यावेळी नांदत होते. एका प्रबल मध्यवर्ती सत्तेच्या अभावी स्वतंत्र झालेली ही राज्ये एक-मेकांवर आक्रमण करून एकमेकांना गिळंकृत करण्याची धडपड करीत होती. 'बळी तो कानपिळी' हाच न्याय अस्तित्वात होता. या गणराज्यां-मध्ये मालव, अर्जुनायन, यौद्धेय, शिवि, लिच्छवि, कुणिन्द, आभीर, मद्रक, औदुम्बर, उत्तमभाद्र, सनकानीक, वृष्णि, प्रार्जुन, काक आणि खरपरिक इत्यादी गणराज्ये होती. त्यापैकीच लिच्छवि ह्या गणराज्याने पाटलीपुत्रावर देखील आक्रमण केले होते. लिच्छवि हे गणराज्य गौतमबुद्धाच्या काळा-पासून वैशाली येथे राज्य करीत होते. या लिच्छवि गणराज्याच्या राज-कन्येने-कुमारदेवीने चंद्रगुप्त नावाच्या महान पराक्रमी सामन्त पुत्राशी विवाह केला. हा चंद्रगुप्त गुप्त वंशातील मोठा सम्राट झाला आणि याच्या कारकीर्दीपासूनच भारतावर पुनःश्च एक प्रबल साम्राज्य नांदू लागले.

हे गुप्त कोण होते, ह्या गुप्त वंशाचा पूर्व इतिहास काय, ह्यासंबंधी इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. काही इतिहासकार गुप्तांना क्षत्रिय मानतात तर काही शूद्र मानतात.

'कौमुदि महोत्सव' नावाच्या नाटकात चण्डसेन म्हणजेच चंद्रसेन अथवा चंद्रगुप्त याला 'कारस्कर' म्हणजेच नीच जातीमधील पुरुष दाखवलेले आहेत. या चण्डसेनाचा आणि लिच्छवीचा वैवाहिक संबंधही या नाटकात दाखवलेला आहे. लिच्छवि हे म्लेंच्छ होते या आधारावरून गुप्त हे क्षूद्र होते असे काही जण म्हणतात, तर लिच्छवि हे क्षत्रिय होते,

भगवान गौतमबुद्धांच्या निर्वाणानंतर त्यांचे अवशेष गौतमबुद्ध क्षत्रिय असल्यामुळे आम्हालाही मिळावेत असा दावा आपण स्वतः क्षत्रिय आहोत असे म्हणून लिच्छवींनी केलेला होता. काही शिलालेखांमधून गुप्त सम्राटांना चंद्रवंशीय क्षत्रिय म्हटलेले आहे. या आधारावर गुप्त राजवंश हा क्षत्रिय होता असे म्हटलेले आहे. काहींच्या मते गुप्त हे जाट होते. काही त्यांना गुप्त या शब्दांवरून वैश्यही मानतात.

इसवी सनाच्या तिसऱ्या शताब्दीच्या उत्तरार्धामध्ये मध्यदेशामध्ये गुप्त घराण्याचा उदय झाला. भारशिव नागांच्या पश्चात मगधामध्ये पाटलीपुत्र आणि त्याच्या आसपासचा प्रदेश यावर श्रीगुप्त या गुप्त वंशातील आदि-पुरुषाचे राज्य सुरू झाले. गुप्त वंशाच्या वंशावळीमध्ये सर्वप्रथम श्रीगुप्त राजाचे नाव दिलेले आहे. इत्सिंग नावाच्या चिनी यात्रिकाने आपल्या प्रवास-वर्णनात लिहिले आहे की, सुमारे ५०० वर्षांपूर्वी श्रीगुप्त नावाच्या एका मोठ्या राजाने काही चिनी यात्रिकांसाठी मृगशिखावनाच्या जवळ एक मंदिर बांधलेले होते. मृगशिखावन गंगेच्या दिशेने नालंदाच्या पूर्वेला सुमारे २०० मैल अंतरावर होते. यावरून श्रीगुप्ताचे राज्य बंगालमधील काही भागां-वरही होते असे दिसते. श्रीगुप्त राजासंबंधी अधिक माहिती उपलब्ध नाही.

श्रीगुप्त राजाच्यानंतर त्याचा पुत्र घटोत्कच हा राजा झाला. याने 'महाराज' हे बिरुद धारण केलेले होते. याने काही काल वैशाली येथे राज्यपाल म्हणून राज्यकारभार पाहिला होता आणि हा आपल्या पित्या-पेक्षा अधिक प्रभावशाली होता. काही सुवर्णमुद्रांवर 'घटो' असे नाव खोदलेले आढळते, तर काहींवर 'काच' असे नाव आढळते. ही दोन्हीही नावे घटोत्कच राजाची होती असे मानले जाते. घटो हे घटोत्कचाचे जसे संक्षिप्त रूप आहे, तसेच काच हे त्याच्याच नावातील शेवटच्या 'त्कच' या शब्दावरून आलेले रूप आहे. मुद्रेवर रेखलेल्या याच्या प्रतिमेमध्ये याच्या डाव्या हातात धनुष्य आणि उजव्या हातात बाण दाखवलेला

आहे. तसेच उजव्या हाताच्याखाली गरुडध्वजाचे चित्र आहे. घटोत्कच राजाविषयीदेखील अधिक माहिती इतिहासात उपलब्ध नाही.

गुप्त-वंशावलीमध्ये घटोत्कच राजानंतर पहिला चंद्रगुप्त या राजाचा उल्लेख आढळतो. हा चंद्रगुप्त गुप्तवंशातील आहे. मौर्य-वंशातील सम्राट चंद्रगुप्ताहून हा वेगळा आहे. गुप्तवंशामध्ये यानेच प्रथमतः ‘ महाराजा-धिराज ’ ही पदवी धारण केली होती.

लिच्छवी गणाशी गुप्त राजवंशाचा वैवाहिकसंबंध चंद्रगुप्तानेच प्रस्थापित केला. कुमारदेवी ही त्याची राणी झाली. या विवाहाला राजकीय-दृष्टया इतिहासात फार मोठे महत्त्व दिले जाते. हर्यक वंशातील बिम्बिसार राजाने, लिच्छविकन्या छलना हिच्याशी विवाह करून ज्याप्रमाणे पहिल्या मगध साम्राज्याचा पाया घातला होता, त्याचप्रमाणे चंद्रगुप्त-कुमारदेवी यांच्या विवाहाने दुसऱ्या मगध साम्राज्याची स्थापना झाली होती. या विवाहामुळेच सर्व लिच्छवि राज्याची प्राप्ती चंद्रगुप्ताला झाली आणि त्याला साम्राज्य स्थापन करता आले. कुमारदेवी आणि चंद्रगुप्त या दोघांच्याही प्रतिमा असलेल्या सुवर्णमुद्रा उपलब्ध झालेल्या आहेत. या मुद्रांना ‘ राजा-राणी ’ प्रकारातील मुद्रा असे म्हटले जाते आणि अशा-प्रकाराच्या मुद्रा चंद्रगुप्तानेच प्रथमतः प्रचलित केल्या होत्या.

चंद्रगुप्ताने आपले साम्राज्य पश्चिमेला प्रयागपासून पूर्वेकडे मगधापर्यंत वाढविलेले होते. चंद्रगुप्त हा महत्वाकांक्षी आणि कर्तबगार सम्राट होता.

याच चंद्रगुप्ताने आपल्या राज्याभिषेकाच्या तिथीपासून एक नवा ‘ गुप्तसंवत् ’ सुरू केला असे मानले जाते. परंतु यासंबंधीही इतिहास-कारांमध्ये बरेच मतभेद आहेत.

या पहिल्या चंद्रगुप्ताचे निधन इ. स. ३२८ मध्ये झाले, असे तत्कालीन शिलालेखावरून कळते.

□



# ‘ पराक्रमांक ’ समुद्रगुप्त

पहिल्या चंद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा समुद्रगुप्त हा इ. स. ३४० मध्ये राज्यावर आला. समुद्रगुप्त याला अंगच्या गुणांमुळे ‘ पराक्रमांक ’ या विशेषणाने गौरविलेले आहे. याचा काळ हा भारतीय इतिहासातील सुवर्णकाल मानला जातो. भारताच्या इतिहासातील पाने सुवर्ण-अक्षरांनी लिहावीत अशी याची कारकीर्द राजकीय दृष्टीने आणि सांस्कृतिक दृष्टीने वैभवशाली होती. हा स्वत: अत्यंत कुशल असा शूर योद्धा, धीरोदात्त सेनापती, चतुर संघटक, संगीत व काव्यप्रेमी, कलारसिक आणि संस्कृती-उपासक असा बहुगुणी व्यक्तिमत्त्वाचा होता. गुप्त राजवंशात याच्यापूर्वी तीन राजे होऊन गेले आणि याच्या वडिलांनी—पहिल्या चंद्रगुप्ताने—गुप्तसाम्राज्याचा पाया घातला हे जरी खरे असले तरी त्या साम्राज्याचे संवर्धन आणि विस्तार समुद्रगुप्ताने आपल्या बाहुबलावर केला हेही तेवढेच खरे आहे. पहिल्या चंद्रगुप्ताचे गुप्तसाम्राज्य वर्धिष्णु

करण्याचे, एक प्रकारचे अपुरे राहिलेले कार्य समुद्रगुप्ताने पूर्ण केले यात शंकाच नाही. समुद्रगुप्ताने तत्कालीन राजकीय वातावरणातील अस्थिरता, लहान लहान राज्यांतील फुटीरपणा, सबलांची दुर्बलांवर चालणारी अरेरावी, ह्या गोष्टी तर संपविल्याच, पण आपल्या प्रबल शत्रूंचाही विमोड करून त्यांना नामोहरम केले. उत्तरेत आणि दक्षिणेत जी अनेक मोठी भारतीय राज्ये स्वतंत्रपणाने वावरत होती त्यांना जिंकून एक प्रबल भारतीय साम्राज्य स्थापन करण्याचा आणि नंतर या संचित शक्तीच्या बळावर शक–कुशाणांच्या हाती भारताचा जो पश्चिमोत्तर प्रदेश अद्याप राहिला होता तो मुक्त करण्याची योजना त्याने आखली. आसाम, नेपाळ इत्यादी पूर्वोत्तर सीमाराज्यांपासून विंध्य पर्वतापर्यंतचा प्रदेश याने जिंकला. त्यानंतर विंध्यपर्वत ओलांडून तो दक्षिणेत आला. या वेळी त्याने दक्षिणेतील प्रमुख अशी बारा राज्ये जिंकली. त्या राजांनी मांडलिकत्व मान्य केल्यानंतर समुद्रगुप्ताने त्यांचे राज्य त्यांना परत देऊन आपले वर्चस्व प्रस्थापित केले. समुद्रगुप्ताच्या ह्या चौफेर पराक्रमाविषयी आणि विजयासंबंधी तत्कालीन आणि नंतरच्या इतिहासकारांनी धन्योद्गार काढले आहेत.

प्रयाग येथील शिलालेखात समुद्रगुप्ताच्या पराक्रमाची बरीच प्रशस्ती केलेली असून एका श्लोकात म्हटले आहे की, “ ज्याप्रमाणे शिवाच्या जटा-जुटरूपी अंतर्गुहेच्या बंधनातून मुक्त झाल्यावर गंगेचे पवित्र जल तिन्ही लोकांना पवित्र करते, त्याप्रमाणे या सम्राटाचे संचित विमलयश दान-परायणता, बाहुबल आणि शास्त्रज्ञान यांच्या उत्कर्षाच्या द्वारा अनेक मार्गांनी, शांतीपूर्वक, त्रिभुवनाला पवित्र करीत आहे. ”

याला एकीकडे ‘ सर्वराजोच्छेता ’ म्हणजे सर्व राजांचे उन्मूलन करणारा असे म्हटलेले आहे, तर दुसरीकडे ‘ शास्त्रतत्त्वार्थ–भर्ता ’ म्हणजे ज्ञानमर्मज्ञ असेही म्हटलेले आहे. असा समुद्रगुप्तासारखा प्रतिभाशाली

राजा इतिहासातही क्वचितच दिसून येतो.

समुद्रगुप्ताच्या राजवटीची माहिती शिलालेख, ताम्रलेख, मुद्रा, साहित्य इत्यादींवरून उपलब्ध होते. प्रयाग येथे असलेल्या स्तंभलेखात तत्कालीन प्रमुख घटना आणि समुद्रगुप्ताचे बहुमुखी व्यक्तित्व यावर बराच प्रकाश पडतो. या स्तंभावर अशोक आणि जहांगीर यांचेही लेख आहेत. त्यांत दोन्ही लेखांचे मध्ये समुद्रगुप्तकालीन लेख आहेत. हा लेख संस्कृत भाषेत असून गद्य-पद्यमिश्रित चम्पू शैलीत आहे. समुद्रगुप्ताची प्रशस्ती यात वर्णिलेली आहे. प्रशस्तीचा पूर्वभाग पद्यात असून उत्तरभाग गद्यात आहे. काही श्लोकांच्या ओळी फुटून तुटून गेल्यामुळे नीट वाचता येत नाहीत. परंतु उपलब्ध ओळींवरून समुद्रगुप्ताविषयी बरीच माहिती मिळते. तिसऱ्या श्लोकात समुद्रगुप्ताचे विद्याप्रेम आणि चौथ्या श्लोकात त्याची युवराज म्हणून नियुक्ती झाली, याची माहिती दिलेली आहे. प्रशस्तीच्या उत्तरार्धात आर्यावर्त, आटविक आणि दक्षिणापथ या प्रदेशांत याने मिळविलेले विजय आणि सीमान्त राज्ये व परकीय शक्तींना याने शरण आणून आपले स्वामित्व मान्य करावयास लावले, इत्यादी पराक्रमाचे वर्णन ललित सुंदर भाषेत केलेले आहे. हा लेख महादंडनायक ध्रुवभूति याचा पुत्र हरिषेण नावाच्या कवीने लिहिलेला आहे.

या लेखात काळाचा वा तिथीचा उल्लेख नाही, तसेच समुद्रगुप्ताने केलेल्या अश्वमेध यज्ञाचाही उल्लेख नाही. यावरून समुद्रगुप्ताच्या कारकीर्दीतच, परंतु अश्वमेध-यज्ञ होण्याच्या पूर्वीच हा लेख लिहिला असावा, असे अनुमान निघते. हरिषेण हा कवी समुद्रगुप्ताचा आश्रित असावा. या लेखातील संस्कृत भाषा साहित्यदृष्ट्या उत्कृष्ट असून मंदाक्रांता, स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित या छंदांमध्ये यातील श्लोक लिहिलेले आहेत. पद्यभागात कालिदासाच्या वैदर्भी शैलीची झलक दिसते तर गद्यभागात बाणभट्टाच्या गौडी शैलीचा आढळ होतो.

मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यात एरण नावाचे एक गाव आहे. त्याचे प्राचीन नाव ऐरिकिण असे होते. येथेही समुद्रगुप्तकालातील एक शिलालेख उपलब्ध आहे. हा लेख संस्कृत श्लोकातच लिहिलेला आहे. या श्लोकात समुद्रगुप्ताने केलेल्या सुवर्णदानाचा उल्लेख असून याबाबतीत त्याला प्राचीन पृथु आणि राघव इत्यादी नृपतींपेक्षा श्रेष्ठ म्हटलेले आहे. 'प्रसन्न झाल्यावर हा कुबेरासारखा आणि रुष्ट झाल्यावर हा यमराजासारखा भासतो,' अशी याची प्रशस्ती केलेली आहे. लेखात पुढे म्हटलेले आहे की, समुद्रगुप्ताची पत्नी दत्तादेवी ही 'पतिपरायण' आणि सन्मार्गाचा अवलंब करणारी 'व्रतिनी' होती. धनधान्य आणि समृद्धी यांनी युक्त असा या नरेशाचा राजप्रासाद पुष्कळशा पुत्र-पौत्रांनी सुशोभित होता. रणांगणांमधील याच्या यशाचे स्मरण होताच याचे शत्रू आपापल्या राज्यात अस्वस्थ-बेचैन होऊन जात असत.

गया येथे एक ताम्रलेख आणि समुद्रगुप्ताची मुद्रा उपलब्ध झालेली आहे, त्यावरून समुद्रगुप्ताने गया जिल्ह्यातील 'रेवतिक' नावाचे गाव कोणा भारद्वाजगोत्रीय विद्वान ब्राह्मणाला दान दिले होते, असे कळते. या लेखातच समुद्रगुप्ताने केलेल्या अश्वमेध यज्ञाचा उल्लेख आढळतो.

नालंदा येथेही एक ताम्रलेख उपलब्ध झालेला आहे. यातही समुद्रगुप्ताने आपल्या मातापित्यांच्या पुण्याभिवृद्धीसाठी जयभट्टस्वामी नावाच्या ब्राह्मणाला दोन गावे दान म्हणून दिली होती असा उल्लेख आढळतो. या लेखातही समुद्रगुप्ताने केलेल्या अश्वमेध यज्ञाचा उल्लेख आलेला आहे. या लेखातच समुद्रगुप्ताला 'परमभागवत' अशा पदवीने गौरविलेले आहे. वैष्णव परंपरा गुप्त वंशात समुद्रगुप्तानेच प्रथम प्रचलित केली होती. याच्या सुवर्णमुद्रांवर वैष्णवधर्मी प्रतिके रेखलेली आहेत. याची राजाज्ञा गरुडध्वजांकित असे. एके ठिकाणी तर याला एक लक्ष गाईंचे दान करणारा—'अनेक गोषत सहस्रप्रदाईनः' असे म्हटलेले आहे. अश्वमेध

यज्ञाचे वेळी एवढ्या मोठ्या संख्येने गोदान केले जात असे.

समुद्रगुप्ताच्या काळी सहा प्रकारच्या सुवर्णमुद्रा होत्या. काही गरुड-ध्वजांकित होत्या तर काहींवर 'धनुर्धारी', 'परशु', 'अश्वमेध', 'व्याघ्र-निहन्ता' आणि 'वीणावादन' अशा प्रतिमा रेखलेल्या होत्या. वीणावादन करणाऱ्या सुवर्णमुद्रेवरून समुद्रगुप्ताची कलाप्रियता चांगलीच लक्षात येते. तसेच त्याचे जीवनचरित, व्यक्तीगत अभिरुची आणि राज्य-कालीन घटना ह्या गोष्टीही स्पष्ट होतात. गरुड, धनुर्धारी आणि परशू या प्रतिमांवरून समुद्रगुप्ताचे पराक्रमी जीवन लक्षात येते. या प्रकारच्या मुद्रांवर राजाने अंगात लांब कोट, पायजमा आणि टोपी घातलेली असून नाना प्रकारचे अलंकार त्याने धारण केलेले आहेत अशी प्रतिमा रेखलेली आहे. प्रतिमेत राजाने डाव्या हातात दंड धारण केलेला असून उजव्या हाताने तो आहुती देत आहे व त्याच्यासमोर गरुडध्वज आहे, असे दाखवलेले आहे.

'व्याघ्र–निहन्ता' प्रतिमा रेखलेल्या मुद्रेवरून समुद्रगुप्ताच्या अभि-रुचीची ओळख पटते. या प्रतिमेत सम्राटाने पगडी, कुडता, धोतर, कर्णभूषणे आणि बाजूबंद परिधान केलेले आहे. तो धनुष्यबाणाने वाघाची शिकार करीत आहे, असे दाखविलेले आहे. यावरून समुद्रगुप्ताला शिकारीची आवड होती हे स्पष्ट होते. युद्धाने आलेला थकवा घालवण्या-साठी व चित्त प्रसन्न करण्यासाठी समुद्रगुप्त शिकार खेळत असे.

'वीणावादन' प्रकारच्या सुवर्णमुद्रेवर सम्राट आसनावर बसून, कुशीत वीणा घेऊन ती वाजवीत आहे, असे चित्र रेखाटलेले आहे. मुद्रेच्या मागच्या बाजूला लक्ष्मीची प्रतिमा रेखलेली आहे.

प्रयाग येथील प्रशस्ती-लेखामधील चवथ्या श्लोकावरून हे स्पष्ट होते की, समुद्रगुप्त हा एक प्रतिभासंपन्न आणि तडफदार युवक होता. त्याच्या अंगी वसत असलेल्या सद्‌गुणांनी प्रभावित होऊन त्याच्या

पित्याने–पहिल्या चंद्रगुप्ताने–त्याला आपला वारस म्हणून नियुक्त केले होते. चंद्रगुप्ताला अनेक पुत्र असावेत आणि त्यातील काही वयाने मोठे असावेत. परंतु त्या सर्वांहून समुद्रगुप्त हा राजा बनण्यास लायक असावा आणि म्हणूनच चंद्रगुप्ताने त्याला आपला वारस म्हणून घोषीत केले असावे. प्रयागच्या लेखात असे वर्णन आहे की, एकदा सम्राटांचे मंत्री, उच्च कर्मचारी आणि राजपुत्र इत्यादी राजसभेमध्ये बसलेले असताना पहिल्या चंद्रगुप्ताने प्रतिभाशाली समुद्रगुप्ताला आलिंगन देऊन म्हटले की, "हे पुत्र ! तू सर्व दृष्टीने योग्य आहेस. मी ज्याप्रमाणे पृथ्वीचे पालन केले, त्याचप्रमाणे तूही कर. या प्रसंगी भावनांच्या कल्लोळांमुळे पित्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले होते. त्याच्या डोळ्यांतून अश्रूधारा वहात होत्या. या राजकीय घोषणेमुळे राजसभेतील सभासद आनंदित झाले, पण जे सिंहासनाची अभिलाषा बाळगून होते ते अन्य राजपुत्र मात्र ग्लानमुख होवून बसले."

वरील घटनेवरून समुद्रगुप्ताला राजा म्हणून त्याच्या पित्याने निवडले होते हे जसे सिद्ध होते तसेच गुप्त कुलांमध्ये राज्याचा वारस होण्यासाठी किंवा राजा बनण्यासाठी ज्येष्ठ पुत्रच असला पाहिजे अशी काही आवश्यकता नव्हती; हेही सिद्ध होते. कोणीही राजपुत्र आपल्या अंगच्या गुणांनी पित्यामार्फत त्याच्या कारकीर्दीतच राज्याचा वारस म्हणून नियुक्त केला जात असे. राजदरबारातील इतर सज्जनांना आनंद झाला याचे कारण म्हणजे एक गुणसंपन्न आणि सुयोग्य व्यक्ती राज्याधिकारासाठी निवडली गेली. ऋद्धपूर येथील वाकाटकांच्या अभिलेखातही समुद्रगुप्ताचा 'तत्पादपरिगृहित' म्हणजे चंद्रगुप्त-प्रथम याने निवडलेला असा उल्लेख आढळतो.

पहिल्या चंद्रगुप्ताने अशा प्रकारे समुद्रगुप्ताला असा वारस निवडल्यावर त्याला राज्याभिषेक करविला आणि त्यानंतर स्वतः संन्यास घेतला.

लौकिक इच्छा–वासनांच्या परिपूर्तीनंतर वृद्धापकाळी संन्यास–आश्रम स्वीकारणे हा भारतीय जीवनपद्धतीमधील एक आदर्श होता. याला अनुसरूनच पहिल्या चंद्रगुप्ताने संन्यासाश्रम स्वीकारला असला पाहिजे.

समुद्रगुप्ताला राज्याधिकार दिल्यामुळे त्याच्या थोरल्या भावाला राग आला आणि त्याने समुद्रगुप्ताविरुद्ध कलह मांडला होता. यात बाकीच्या सर्व बंधूंनी समुद्रगुप्ताच्या विरुद्ध थोरल्या भावाचा पक्ष घेतला होता, तत्कालीन उपलब्ध झालेल्या एक मुद्रेवर ‘ काच ’ असा शब्द आहे. त्यावरून या थोरल्या भावाचे नाव काच असावे आणि त्यानेच हा कलह मांडून आपल्या नावाच्या मुद्रा पाडून स्वतःला राजा म्हणवून घेण्याचा प्रयत्न केला असावा असे अनुमान काही इतिहासकार काढतात. समुद्रगुप्ताने राज्यावर येताच आपल्या शत्रूंचे दमन केले असा जो उल्लेख प्रयागच्या लेखात आढळतो त्याचा अर्थ हा गृहकलहच त्याने निपटून टाकला असावा असेही काही विद्वानांचे मत आहे. समुद्रगुप्ताने अशा प्रकारे गृहकलह मिटविलेला असावा किंवा साम्राज्याच्या अन्य शत्रूंचा विमोड केला असावा. काही असले तरी समुद्रगुप्ताने आपल्या शत्रूंचा बंदोबस्त करून आपले साम्राज्य सुदृढ केले हे खरेच. प्रयागच्या प्रशस्तीलेखात भूमंडलाला बांधणारा याअर्थी समुद्रगुप्ताला ‘ धरणी-बंध ’ असे म्हटलेले आहे. याचा अर्थ समुद्रगुप्त हा भारताचा एकमेव सम्राट होता असाच होता. तो विविध प्रकारच्या युद्धकलांचा मर्मज्ञ होता आणि शेकडो लढायांमध्ये त्याने भाग घेतला होता. याला या लेखात ‘ पराक्रमांक ’ असे म्हटलेले असून तो फरसा, बाण, शंकु, शक्ति, तोमर, भिन्दिपाल, नाराच आणि वैतस्तिक इत्यादी अनेक प्रकारची शस्त्रे चालवण्यामध्ये अत्यंत कुशल होता. अनेक शस्त्रांच्या जखमांची चिन्हे त्याच्या शरीरावर होती आणि त्यामुळे त्याची कांती द्विगुणीत

झालेली होती. आपल्या बाहुबलावर त्याचा विश्वास होता आणि युद्धाच्या द्वारा तो भारताचा चक्रवर्ती राजा बनण्याची अभिलाषा बाळगून होता. तिच्या पूर्तीसाठी त्याने आपल्या समकालीन राजांना आणि प्रतिस्पर्ध्यांना पराजित केले. शिलालेखात याला शत्रूंचे मर्दन करणारा ( जितरिपुः ), अजेय ( अजितः ), अद्वितीय योद्धा ( अप्रतिरथः ), अतुलनीय पराक्रमी ( अप्रतिवार्य्यविर्य्यः ), पृथ्वीला जिंकणारा ( विजित्यक्षितिं ), प्रतिस्पर्धी राजपुत्रांचा विजेता ( राजज्येता ), पराक्रमाने विविध राजांना पराभूत करणारा ( स्वभुजबलविजितानेकनरपतिः ) आणि स्वर्गलोक जिंकण्याचीही महत्त्वाकांक्षा बाळगणारा ( दिवंजयति ) असे म्हटलेले आहे. समुद्रगुप्ताच्या दिग्विजयी स्वभावाचा परिचय यावरून होतो. त्याने पुढील राजांचा पराभव केला होता.

सर्वप्रथम समुद्रगुप्ताने उत्तर भारतामध्ये युद्ध करून अच्युत, नागसेन आणि कोतुकुलज या तीन राजांना जिंकले होते. अच्युत हा एक नागवंशातील राजा होता आणि अहिच्छत्र येथे त्याचे राज्य होते. त्याची काही नाणीही सापडलेली आहेत, त्यावरून तो चौथ्या शताब्दीच्या मध्यास होऊन गेला असे अनुमान आहे. नागसेन हा सुद्धा नागवंशी राजा होता. ग्वाल्हेरजवळील नारवाडपासून पंचवीस मैलांवरील पद्मावती येथे याचे राज्य होते. 'हर्षचरिता 'मध्ये याचा उल्लेख आलेला आहे. 'राज्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे याला शत्रूकडून जीव गमवावा लागला,' असे याच्यासंबंधी म्हटलेले आहे. पद्मावती येथेच याचा वध झाला होता. कोतुकुलज हा कोत-वंशातील राजा होता. प्रयागच्या प्रशस्तीलेखात असे म्हटले आहे की, 'समुद्रगुप्त जेव्हा पुष्पपूर म्हणजे पाटलीपुत्र येथे क्रीडा करीत होता तेव्हा त्याच्या सेनेने या राजाला बंदीत टाकले होते.' या राजाची काही नाणी दिल्ली आणि पूर्व पंजाबच्या आसपासच्या भागात सापडलेली आहेत त्यावरून याचे राज्य त्या भागावर होते असे

अनुमान निघते. या तिन्ही राजांनी एकत्र येऊन समुद्रगुप्ताच्या नव्या राजवटीला विरोध करण्याची तयारी केली होती, पण समुद्रगुप्ताने आपल्या पराक्रमाने त्यांच्याशी लढून त्यांचाच नाश केला होता. हे युद्ध कौशाम्वी येथे झाले असावे असे अनुमान आहे. कारण कौशाम्वी हे एक केंद्रिय ठिकाण असून वरील तीनही राजे तेथे एकत्र येऊ शकत होते. परंतु याविषयी विद्वानांमध्ये मतभेद असून काहींचे म्हणणे असे आहे की, हे आर्यावर्त-युद्ध वरील तिन्ही राजांनी मिळून पाटलीपुत्रावर हल्ला केल्या-मुळे पाटलीपुत्रातच झाले. हे 'आर्यावर्त-युद्ध' जिंकल्यानंतर पाटलीपुत्रात विजयमहोत्सव साजरा करण्यात आला होता.

या विजयानंतर समुद्रगुप्ताने उत्तर भारतामधील रुद्रदेव, मतिल, नागदत्त, चंद्रवर्मा, गणपतीनाग, नंदी, बलवर्मा इत्यादी राजांचा पराभव केला. या युद्धाला दुसरे 'आर्यावर्त-युद्ध' असे म्हटले जाते. विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील रिवा आणि सागर या जिल्ह्यात वाकाटक सरदारांची सत्ता होती. समुद्रगुप्ताने त्यांचाही पराभव करून हा प्रदेश आपल्या साम्राज्यात घेतला होता.रुद्रसेन हा वाकाटक वंशातील राजा होता. चंद्रवर्मा हा राजा वंगालमधील बाँकुडा जिल्ह्यातील प्रदेशावर राज्य करीत होता. दामोदर नदीच्या काठी सुसुनिया नावाच्या पहाडाजवळ याची राजधानी होती. गणपतीनाग हा राजा विदिशानगरीमध्ये राज्य करीत असलेल्या नाग-वंशातील राजा होता. याचा नाणी मथुरेजवळही सापड-लेली आहेत, त्यावरून त्याकाळचा हा एक पराक्रमी राजा होता आणि विदिशापासून मथुरेपर्यंत याचे राज्य पसरले होते, असे अनुमान निघते. नंदी हाही नाग-वंशातील एक राजा होता. या सर्व लहान-मोठ्या राजांनी एकत्र [illegible] समुद्रगुप्ताच्या सत्तेला आव्हान दिले होते. परंतु समुद्रगुप्ताने [illegible] पराभव केला होता. आर्यावर्तातील या सर्व राजांना जिंकल्[illegible]मुळे समुद्रगुप्ताची महानता वर्धिष्णू झाली होती. [illegible]


त्यांची राज्ये आपल्या राज्यात दाखल करून टाकलेली होती. या दोन्ही युद्धानंतर समुद्रगुप्ताला उत्तर भारतामध्ये कोणी प्रतिस्पर्धी उरला नाही. तो एकमेव बलशाली आणि प्रभावशाली सम्राट बनला.

आर्यावर्त–विजयानंतर समुद्रगुप्ताने जंगली प्रदेशांवर चाल करून तेथील राजांचा पराभव केला होता. यांना 'आटविकराज' असे म्हटले आहे. ही राज्ये उत्तरेकडे गाझिपुरापासून (आलवक) ते जबलपुरापर्यंत (डभाल) पसरलेली होती. डभाल येथील राजा हस्तिन् याच्या अंमलाखाली १८ जंगली राज्ये होती. त्यांपैकी काहींची नावे कोटाटवी, सहलाटवी, विंध्याटवी अशी होती. विंध्य वनातूनच दक्षिणेकडे जाणारा रस्ता मोठा होता. या मार्गालाच पाणिनी व कात्यायन यांनी 'कान्तार-पथ' असे म्हटलेलं आहे. ही आटविक राज्ये आपल्या साम्राज्यात सामावून टाकल्या नंतर समुद्रगुप्त याच मार्गाने दक्षिणापथात उतरला होता. यापूर्वी समुद्रगुप्ताने सागर जिल्ह्यातील एरण येथे आपली एक उपराजधानी स्थापन केली होती आणि एक राज्यपालही तेथे नियुक्त केला होता. समुद्रगुप्ताच्या साम्राज्यातील सीमा यावेळी नर्मदेपर्यंत येऊन ठेपली होती. समुद्रगुप्ताच्या काही मुद्रांवर सिंहावर बसलेल्या देवीची प्रतिमा आढळते. सिंहवाहिनी दुर्गा अथवा पार्वती यांच्याशी या प्रतिमेचा अर्थ लावला जातो. दुर्गा 'विंध्यवासिनी' आणि पार्वती 'हैमवती' मानल्या जातात. याचा अर्थ असा की, समुद्रगुप्ताचे साम्राज्य त्यावेळी हिमालय आणि विंध्यपर्वत यांच्यामधील प्रदेशांवर पसरलेले होते. समुद्रगुप्ताच्या काही मुद्रांवर मकर वाहिनी गंगेचीही प्रतिमा आढळते. यावरून त्याने गंगेच्या खोऱ्यात विजय मिळविलेला होता, हे सिद्ध होते. गुप्तकालीन मंदिरांच्या चौकटीवर मकरवाहिनी गंगेची आकृती रेखलेली आढळते.

उत्तर भारतातील या दिग्विजयानंतर समुद्रगुप्त आपल्या सैन्यबळाच्या जोरावर दक्षिण भारत जिंकून घेण्याची अभिलाषा बाळगून

होता. ‘ आसमुद्रक्षितिश ’ म्हणजे समुद्रापर्यंत वसुंधरेचा उपभोग घेणारा राजा हा आदर्श पूर्ण करून त्याला आपले ‘ समुद्र ’ हे नाव सार्थ करावयाचे होते. त्यानुसार त्याने दक्षिणेतील कोसलचा महेंद्र, महा-कांतारचा व्याघ्रराज, कोरलचा मण्टराज, पिष्ठपूरचा महेन्द्रगिरी, कोट्टूरचा स्वामिदत्त, एरण्डपल्लचा दमन, कांचीचा विष्णुगोप, अवमुक्तचा नीलराज, वेंगीचा हस्तिवर्मा, पालक्कचा उग्रसेन, देवराष्ट्राचा कुबेर आणि कुस्थल-पूरचा धनंजय अशा बारा राजांचा पराभव करून त्यांची राज्ये आपल्या साम्राज्यात सामावून टाकली होती. आणि आपले स्वामित्व त्यांच्या-कडून मान्य करवून घेतल्यानंतर त्यांचेकडे त्यांच्या त्यांच्या राज्यांतील कारभार सोपविला होता. पाटलीपुत्राला राहून सुदूर दक्षिणेतील एवढ्या प्रदेशावर स्वतःच कारभार पाहणे व्यवहारतः अशक्य होते ही गोष्ट समुद्रगुप्ताने लक्षात घेतली होती. आणि म्हणून त्याने जिंकून घेतलेला प्रदेश त्या त्या राजांकडेच सोपवून त्यांची सहानुभूती मिळविली होती.

□



# भारतीय नेपोलियन

दक्षिणापथात समुद्रगुप्ताने जे अपूर्व यश मिळविले, त्याने सीमान्त राजेदेखील हादरून गेले. समुद्रगुप्ताचा पराक्रम पाहून या राजांनी त्याचे आधिपत्य स्वीकारले. सीमांत राजांना प्रयागच्या प्रशस्तीलेखात ‘ प्रत्यन्त नृपति ’ असे म्हटले असून त्यांच्या सीमांत राज्यांना ‘ प्रत्यन्त शक्ती ’ असे म्हटलेले आहे. समतट, डवाक, कामरूप, नेपाळ, कर्तृपूर असे पाच प्रत्यन्त नृपति आणि मालव, अर्जुनायन, यौधेय, मद्रक, आभीर, प्रार्जुन, सनकानीक, काक आणि खरपरीक अशी नऊ गणराज्ये समुद्र-गुप्ताच्या आधीन झाली होती.

समतट राज्य बंगालच्या पूर्व समुद्रतटावर होते. याची राजधानी कोमिल्लाजवळ कर्म्मान्त येथे होती. डवाक हे आधुनिक डाक्का शहराचे प्राचीन नाव होते. आधुनिक आसामचे नाव कामरूप होते. आसामच्या मध्यवर्ती प्रदेशाला आजही कामरूप असेच म्हटले जाते. समुद्रगुप्ताचा

समकालीन कामरूपचा राजा पुष्यवर्मा अथवा समुद्रवर्मा या नावाचा होता. प्राचीन नेपाळ हा प्रदेश आधुनिक गण्डक आणि कोसी यांच्या मधल्या भागात वसलेला होता. कोसीला आजही 'नेपाळची घाटी' असे म्हटले जाते. नेपाळचा प्रथम उल्लेख कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये आलेला आहे. त्या ग्रंथात तेथे तयार होणाऱ्या उत्तम दर्जाच्या लोकरी कांबळीचे ('नेपालकम्) वर्णन दिलेले आहे. विशेष प्रकारच्या मेंढ्यांच्या लोकरीपासून तयार होणाऱ्या या नेपाळी कांबळ्या प्राचीन भारतात फारच लोकप्रिय व प्रसिद्ध होत्या. समुद्रगुप्ताच्या वेळी नेपाळमध्ये लिच्छवी वंशातील लोक राज्य करीत होते. वैशालीतील लिच्छवी राज्यापासून हे राज्य वेगळे होते. कर्तृपूर हे पंजाबमधील जालंदर जिल्ह्यातील कर्तारपूर असावे असे काही इतिहासकारांचे मत असून काहीजण कमायूँ, गढवाल आणि रोहिलखंड येथील प्राचीन 'कतुरिया' हे राज्य असावे असे मानतात.

नऊ गणराज्यांपैकी काही फारच प्राचीन होती. सिकंदराच्या आक्रमणाच्या वेळी ही गणराज्ये पंजाब आणि पश्चिमोत्तर भारताच्या भागामध्ये अस्तित्वात होती. ग्रीक लेखकांनी त्यांची युद्धकला, व्यूहरचना इत्यादींची मुक्त कंठाने प्रशंसा केलेली आहे. बाह्य आक्रमणांमुळे मूळच्या अधिकारक्षेत्राचा त्याग करून हे गण माळवा, राजस्थान, पूर्व पंजाब आणि मध्यप्रदेश इत्यादी विभिन्न भागांत जाऊन बसले.

मालव हे गणराज्य प्राचीन होते. पाणिनीच्या 'अष्टाध्यायी' ग्रंथामध्ये या गणराज्याचा उलेख आलेला आहे. 'काशिका'मध्ये मालवगण अथवा मालव्य याचा उल्लेख वाहिक अथवा पंजाब येथील 'आयुधजीवि' संघाच्या अंतर्गत केलेला आहे. ग्रीक लेखकांनी मालवांना 'मल्डोई' असे म्हटले आहे. सिकंदरच्या आक्रमणाच्या वेळी मालव लोक पंजाबच्या काही भागात राज्य करीत होते. त्यांनी रावी नदीच्या किनारी सिकंदरला जोरदार प्रतिकार केला होता. या गणराज्याची काही नाणी उपलब्ध

झालेली आहेत, त्यांवर ' मालवानां जय: ' आणि ' मालवगणस्य जय: ' असे शब्द कोरलेले आहेत. नहपान क्षत्रप याचा जामात उषवदात याने उज्जैनीत मालवांचा पराभव केला होता. त्या विजयानंतर उषवदात याने पुष्करतीर्थामध्ये स्नान करून ब्राह्मणांना तीन हजार गाई आणि एक गाव दान दिले होते. समुद्रगुप्ताच्या काळी मालव लोक मेवाड, टोंक आणि राजस्थानमधील दक्षिण-पूर्व भागातील काही प्रदेशांवर राज्य करीत होते.

अर्जुनायन या गणराज्याच्या नावाचा संबंध काही पांडवांपैकी अर्जुनाशी लावतात, तर काहीजण पंजाबमध्ये राज्य करणाऱ्या ' पांडूओई ' जातीशी लावतात. या गणराज्याचा उल्लेख वराहमिहिराच्या ' बृहत्संहिता ' नामक ग्रंथात आढळतो. या ग्रंथानुसार हे लोक उत्तर खंडात निवास करीत होते. यांची काही नाणी सापडली असून त्यावर ' अर्जुनायन ' असे शब्द कोरलेले आहेत. समुद्रगुप्ताच्या काळी या गणराज्यातील लोक भरतपूर आणि पूर्व राजपुताना यामधील जयपूरच्या जवळपास राज्य करीत होते.

यौधेय गणराज्याचा संबंध महाभारतानुसार युधिष्ठिराचा पुत्र यौधेय याच्याशी जोडला जातो. हरिवंशात यौधेयांचा संबंध उशीनर यांच्याशी जोडलेला आहे. पाणिनीने यौधेयांचा उल्लेख आयुधजीवि संघात केलेला आहे. आयुधजीवि संघ म्हणजे जे लोक शस्त्रांच्या द्वारा आपली जीविका चालवितात अशांचा गट. बहुधान्यक प्रदेशात म्हणजेच आजच्या हरियानात रोहटक येथे त्यांची राजधानी होती. यांची काही नाणीही सापडलेली आहेत आणि त्यावर ' यौधेयगण ' आणि ' यौधेयगणस्य जय: ' असे शब्द कोरलेले आहेत. रुद्रदामनच्या गिरनार येथील शिलालेखात यौधेय यांचा उल्लेख आढळतो. आपली शक्ती आणि साधन-संपन्नता याच्या जोरावर यौधेय संपूर्ण क्षत्रीय मंडळामध्ये स्वत:ला वीर

म्हणून सिद्ध करण्याच्या खटाटोपात गर्वोन्मत्त झाले होते. पण रुद्रदामनने यौधेयांचा पराभव केला होता. सतलज नदीच्या काठच्या प्रदेशावर यांचे राज्य होते.

मद्रक या गणकराज्यातील लोक रावी आणि चिनार या नद्यांच्या मधल्या भूमीवर राज्य करीत होते. महाभारतानुसार मद्रांची राजधानी शालक येथे होती. शालक याचेच आजचे नाव सियालकोट असे आहे. सिकंदराच्या वेळी येथे कठ जातीतील लोक राज्य करीत होते. या नगराच्या चोहोबाजूला एक उंच तट आणि खोल खंदक होता. ग्रीक सैनिकांच्या अत्याचारापासून जीव बचावण्यासाठी काही नागरिकांनी ह्या खंदकात उड्या घेतल्या होत्या आणि पोहून ते पार गेले होते. हा खंदक एवढा मोठा होता की, त्याला सरोवर म्हटले जाई. कालांतराने याच ठिकाणी ग्रीक राजा मिनॅण्डर अथवा मिलिंद याने आपली राजधानी स्थापन केली होती. 'मिलींदपन्हो' नावाच्या ग्रंथात या नगरीला 'योन-कानं नगरम्' म्हणजे 'यवन-नगर' असे म्हटले आहे.

आभीर हे गणराज्यही प्राचीन होते. पतंजलीच्या महाभाष्यात यांना शूद्र म्हटलेले आहे. यांचे सिकंदरशी युद्ध झालेले होते. हरियानातील हिसार या प्रदेशावर यांचे राज्य होते. आभीरांनी महाराष्ट्रावर एके काळी राज्य केले होते. कालांतराने आभीर-गण पश्चिम राजपुतानामध्ये राज्य करू लागला. पुढे काही कालानंतर आभीरांची एक शाखा तेथून मध्य-भारतात गेली आणि ते झाशी व भिलसा यांच्या मधील प्रदेशांवर राज्य करू लागले. तेथे यांची राजधानी अहिरवाडा येथे होती. प्राचीन काळी या नगराला 'आभीरबाट' म्हणजे आभीरांचे निवासस्थान असे नाव होते. समुद्रगुप्ताच्या वेळी आभीर गणराज्याच्या या दोन्हीही शाखा अस्तित्वात होत्या आणि त्यांनी समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व स्वीकारलेले होते.

प्रार्जुन या गणराज्याचा उल्लेख कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' नामक

ग्रंथात आलेला आहे. या गणातील लोक मध्यप्रदेशातील नरसिंहपूर जिल्ह्यात राज्य करीत होते.

सनकानीक या गणराज्यातील लोक आधुनिक भिलसा या मध्यभारतातील भागावर राज्य करीत होते. चंद्रगुप्त-विक्रमादित्यकालीन उदयगिरीवरील वैष्णव–गुहालेखात सनकानीक भिलसा येथे गुप्तांच्या अधिनतेखाली राज्य करीत होते, असे म्हटलेले आहे.

काक या गणराज्याचा उल्लेख महाभारतात आढळतो. भिलसापासून वीस मैलांवर असलेल्या काकपूर नावाच्या नगरात या गणराज्यातील लोक राज्य करीत होते. काहीच्या मते सांची येथे यांचे राज्य होते. प्राचीन लेखांवरून सांचीला 'काकबाट' अथवा 'काकनादबाट' अशी नावे होती असे कळते. काक लोक येथे राहात असल्यामुळेच ही नावे पडली असावीत असे अनुमान आहे.

खरपरीक या गणराज्याचा उल्लेख बतिहड येथील शिलालेखात आढळतो. खरपरीक लोक मध्यप्रदेशातील दमोह जिल्ह्यावर राज्य करीत होते.

प्रयाग येथील प्रशस्तीलेखावरून अशी माहिती मिळते की, समुद्रगुप्ताने सीमान्त राज्यांना आपली आज्ञा मानण्यास, तसेच विशिष्टप्रसंगी राजधानीमध्ये उपस्थित होऊन गुप्त सम्राटांना प्रणाम करण्यास भाग पाडले होते. उभयतांच्यामध्ये झालेल्या तहानुसार या सीमान्त राज्यांना गुप्त सम्राटांना सर्व प्रकारचे कर द्यावे लागत होते. या मांडलिक गणराज्यांचा उपयोग सैनिकदृष्टया देशाबाहेरील शक, कुशाण आणि मुरुंड इत्यादी विदेशी शक्तींना थोपवून धरण्यासाठी झाला होता. उत्तरेतील आणि वायव्येकडील सीमान्त राज्ये खालसा न करता त्यांना आपले मांडलिक बनवून तसेच ठेवण्यात समुद्रगुप्ताची राजकीय दूरदृष्टी दिसून येते.

प्रयाग येथील प्रशस्तीलेखांत असे म्हटले आहे की, कुशाण, शक

मुरुंड, सिंहलद्वीप आणि सर्वद्वीप या बाह्य विदेशी शक्तींनी समुद्रगुप्ता-पुढे शरणागती पत्करली होती. आपल्या कन्या भेट म्हणून दिल्या होत्या, आणि गरुडमुद्रांकित असे समुद्रगुप्ताचे आदेश आपापल्या राज्यात अंमलात आणण्याचे त्यांनी मान्य केले होते. समुद्रगुप्ताची मैत्री संपादन करण्यास त्याच्या अतुल पराक्रमामुळेच या विदेशी राजांना भाग पडले होते. ते आपल्या राजदूतांच्या मार्फत समुद्रगुप्ताच्याकडे बहुमूल्य अशा भेटीही पाठवीत असत.

समुद्रगुप्ताने भारतामध्ये एक विशाल साम्राज्य निर्माण केले होते, आणि त्याचा तो अधिपती बनला होता.

समुद्रगुप्ताने एवढे विशाल साम्राज्य निर्माण केले आणि ते तेवढ्याच समर्थपणाने राखले हे त्याचे वैशिष्ट्य होय. यात त्याच्या राजकीय ज्ञानाची, मुत्सद्दीपणाची, आणि दूरदृष्टीची ओळख पटते. समस्त भारतवर्षामध्ये आपले एकछत्री साम्राज्य प्रस्थापित करण्याच्या भावनेने तो प्रेरित झाला होता. परंतु तरीही जिंकलेली सर्वच राज्ये आपल्याच हाती न ठेवता किंवा आपल्या साम्राज्यात समाविष्ट न करता ती काही राजांकडून आपले मांड-लिकत्व कबूल करून घेऊन त्यांना परत दिली. यायोगे त्याने आपल्या-विषयी स्नेह व सदिच्छा निर्माण करून ठेवल्या. साम, दाम, दंड, भेद इत्यादी अनेक प्रकारांनी त्याने आपले साम्राज्य वाढवले आणि सांभाळले.

समुद्रगुप्ताची राज्यव्यवस्था उत्कृष्ट होती. गुप्तवंशात यानेच प्रथम सरदार वर्ग निर्माण केला. याच्या राज्यकारभारातील काही महत्वाच्या पदाधिकाऱ्यांचा उल्लेख शिलालेखात आढळतो :

'खाद्यटपाकिक'—हा भोजन शाळेशी संबंधित अशा विभागाचा वरिष्ठ अधिकारी होता आणि या पदावर ध्रुवभूती नावाचा कर्मचारी नेमलेला होता. 'सान्धिविग्रहिक'—हा राजाचा परराष्ट्र सचिव आणि मंत्रिमंडळातील महत्वाचा सदस्य असे. युद्ध आणि संधी म्हणजे तह या

संदर्भात सम्राटाला सल्ला देण्याचे कार्य हा करीत असे. हा सम्राटाच्या अत्यंत विश्वासातील आणि सदैव कार्यरत असा चतुर पुरुष असे. समुद्रगुप्ताच्या वेळी हरिषेण या पदावर होता. 'कुमारामात्य'–गुप्त-काळामध्ये जिल्हाधिकारी, राज्यपाल आणि सचिव अशा श्रेष्ठ स्थानांवर कुमारामात्य या हुद्याचा अधिकारी नियुक्त केला जात असे. 'महादण्डनायक'–हा पोलीस विभागाचा सर्व श्रेष्ठ अधिकारी असे. फौजदारी गुन्ह्यांच्या संबंधित अशा खटल्यांचा निकाल देण्याचे काम याच्याकडे असे.


समुद्रगुप्त विद्या व कला यांचाही भोक्ता होता, तो विद्वानांचा चाहता होता, तो शास्त्रांचा ज्ञाता होता. त्याने काव्यरचनाही केली होती. त्याला 'कविराज' अशी पदवीही प्राप्त झालेली होती. समुद्रगुप्त हा संगीतज्ञ आणि कलारसिक होता. त्याला संगीताची जाणकारी विशेष प्रकारची होती. याच्या काही मुद्रांवरही वीणावादकाची प्रतिमा रेखलेली होती.

हा सज्जनांचा उद्धारक आणि दुष्टांचा संहारक होता, शूर वीर होता, तशाच कोमल भावनाही त्याच्याजवळ होत्या. हा गुणीजनांचा चाहता होता, तसाच प्रजावत्सल सम्राट होता, अशी याच्याबद्दलची प्रशस्ती शिलालेखांत आढळते.

याच्या अंगच्या पराक्रमाने स्तिमित होऊन समुद्रगुप्ताला स्मिथ नावाच्या इतिहासकाराने 'भारतीय नेपोलियन' असे म्हटलेले आहे. समुद्रगुप्ताने सुमारे इ. स. ३५० ते ३७५ पर्यंत राज्य केले. एवढ्या थोडक्या काळातही त्याने आदर्श सम्राट म्हणून कीर्ति मिळविली आणि भारतातील सुवर्णकालाचे प्रस्थान ठेवले.

□

२२५४२ 22/10
विषय



# अश्वमेध

भारत-द्विग्विजय केल्यानंतर समुद्रगुप्ताने अश्वमेध यज्ञ केला होता. अशा प्रकारच्या अपूर्व द्विग्विजयानंतर स्वतःला सम्राट म्हणून घोषित केल्यावर आपल्या विजयाप्रीत्यर्थ व सार्वभौम सत्तेचे चिन्ह म्हणूनही अश्वमेध यज्ञ करण्याची प्राचीन परंपरा आहे. अश्वमेध यज्ञ ऋग्वेद कालापूर्वीच भारतात प्रचलित झाला होता. या यज्ञाच्या उत्पत्तीची एक आख्यायिका अशी आहे :

प्रजापतीच्या डोळ्यातले एक बुबुळ एकदा निसटले आणि ते खाली भूमीवर पडले. त्या बुबुळामधून एका अश्वाची उत्पत्ती झाली. प्रजापतीचा नेत्र बुबुळहीन राहिला, म्हणून देवांनी त्या अश्वाला मारून म्हणजे अश्वमेध करून प्रजापतीचे बुबुळ परत त्याच्या डोळ्यात बसविले; आणि त्यावेळेपासूनच प्रजापतीला संतुष्ट करण्यासाठी अश्वमेध यज्ञ करण्याची प्रथा पडली.

भारतीय संस्कृती-कोशामध्ये याच्यासंबंधी अशी माहिती दिलेली आहे

की, " अश्वमेधासाठी श्यामकर्ण घोडा लागतो. त्याच्या शुभ्र वर्णावर काळे ठिपके असावेत असेही सांगितले आहे. त्याला प्रथम जलाशयावर नेऊन मंगलस्नान घालतात. अध्वर्यु, शंभर राजपुत्रांसह त्याच्या पूर्वेस उभा राहतो. राज्याला अनधिकारी अशा शंभर क्षत्रियांसह ब्रह्मा त्याच्या दक्षिणेस उभा राहातो. सारथी व ग्रामाधिपती अशा शंभर पुरुषांसह होता त्याच्या पश्चिमेस उभा रहातो. क्षत्तृ जातीतल्या व कोशागारावरच्या शंभर लोकांसह उद्गाता उत्तरेस उभा रहातो. हे चौघे ऋत्विज पाणी शिंपडून घोड्याला स्वच्छ धुतात. घोड्याबरोबर एक कुत्रे पाण्यात सोडतात व मुसळांनी त्याला ठार मारून त्याचे प्रेत घोड्याच्या पोटाखाली तरंगत ठेवतात. स्नान घातल्यावर घोड्याला यज्ञशाळेत अग्नीजवळ आणतात. त्याच्या अंगावरून पाणी निथळून जाईपर्यंत अग्नीला आहुति देतात. मुंजमेखलेने प्रथम त्याला बांधतात व मग सर्व देशात वर्षभर संचार करण्यासाठी मोकळा सोडतात. त्याच्या रक्षणासाठी चारशे शस्त्रसज्ज लोक त्याच्या मागून जातात. जो राजा त्या घोड्याला पकडील त्याच्याशी युद्ध करून घोडा सोडवून घेतात.

" अशा प्रकारे घोडा सर्वत्र विजयी झाला म्हणजे एका वर्षाने त्याला परत आणतात. त्या मुदतीत त्रिकाळ सारस्वत्य नामक इष्टि करतात. इष्टीनंतर ब्राह्मण राजस्तुतिपर गाथा गातो. होता राजाला पारिप्लव नामक आख्यान सांगतो. घोडा सोडल्यापासून तो परत येईपर्यंत अध्वर्यु हाच राजा होतो असे आपस्तम्ब सांगतो. घोडा आपल्या संचारात आजारी पडला किंवा मेला, तर अनेक प्रायश्चित्ते सांगितली आहेत. शत्रूने घोडा पळविला व तो परत मिळविता आला नाही, तर अश्वमेध होतच नाही."

अश्वमेधाचा विधी सत्यापाढ श्रौतसूत्रात पुढीलप्रमाणे सांगितला आहे–

" चैत्रपौर्णिमेस यज्ञाचा प्रारंभकर्ता राजा प्रथम सांग्रहणि इष्टि करतो. मग ऋत्विजांचे वरण व यज्ञाचा संकल्प करतो. नंतर दीक्षा घेतो. केस व

नखे काढतो. स्नान करून वस्त्रालंकार घालतो. मौन पाळतो. मग राजाच्या चार राण्या नटून थटून राजाजवळ येतात. यजमान त्यांच्यासमवेत अग्निशालेत प्रवेश करून गार्हपत्याच्या पश्चिमेस उत्तराभिमुख बसतो.

या यज्ञात घोड्यासह अनेक पशूंचे हनन व्हायचे असते. त्या पशूंना बांधण्यासाठी बेलाचे, खैराचे व पळसाचे प्रत्येकी सहा, देवदारुचे चार, व रगतरोड्याचा एक असे एकूण तेवीस यूप तयार करतात. वीस यूपांना प्रत्येकी नऊ असे मिळून एकशेऐंशी पशू बांधतात. रगतरोड्याचा यूप हा अश्वासाठी असतो. तो मुख्य यूप होय. त्याला चातुर्मास्य, ऐकिदशिन व दशिन या संज्ञांचे आणखी कितीतरी पशू बांधतात. या सर्व पशूंचे ग्राम्य ( गावातले म्हणजे पाळीव ) व अरण्यक ( रानातले ) असे दोन वर्ग असतात. अरण्यक पशूंना मारीत नाहीत. त्यांच्यावर काही संस्कार करून त्यांना सोडून देतात.

" अश्वमेधात सुत्यादिनांपैकी दुसरा दिवस महत्त्वाचा असतो. त्या दिवशी प्रथम मेध्य अश्वाला इतर तीन घोड्यांसह रथाला जुंपतात. त्या रथात बसून यजमान व अध्वर्यु प्रथम जलाशयावर जातात. मग तो रथ यज्ञभूमीच्या सभोवती फिरवितात. रथावर विजयध्वज फडकत ठेवतात. यज्ञभूमीत आणल्यावर राजाच्या राण्या अश्वाच्या अंगाला आज्य चोळतात. यज्ञाजवळ ब्रह्मा व होता यांच्यामध्ये 'ब्रह्मोद्य' नामक कूट प्रश्नोत्तरे होतात. वेदीच्या बाहेर पट्टराणीला उद्देशून होता बिभत्स व ओंगळ असे काही शब्द उच्चारतो. राणी त्याला तसेच प्रत्युत्तर देते. राजाच्या राण्या अश्वाच्या अंगाला काही ठिकाणी सोन्यारुप्याच्या सुया टोचून खुणा करतात.

" घोड्याला मारायला नेताना त्याच्यापुढे एक घोडी चालवितात. मग एके ठिकाणी वेतम वृक्षाच्या डहाळ्या पसरवितात. त्यावर तुपात भिजविलेले लोकरीचे वस्त्र अंथरतात. त्यावर पांघरवयाचे कापडे पसरतात. त्यावर सुवर्णखचित शय्या पसरतात. तीवर रुप्याचा पत्रा ठेवतात. मग त्या

पत्र्यावर घोड्याला आडवे पाडून त्याला मारतात. घोड्याला मारल्यानंतर त्याच्या शरीरातील चंद्रनाभक मेदाचा यज्ञ करतात. सदस् व ऋत्विज एकमेकांना कोडी घालतात. अनेक देवतांना आहुति देतात. राजाला अभिषेक करतात. शेवटी वरुणप्रतीक समजून एका खल्वाटाच्या ( टक्कल पडलेला माणूस ) डोक्यावर आहुति ठेवतात. त्याला शंभर गाई व एक बैलगाडी देतात. या यज्ञात अध्वर्यु, होता, इत्यादी ऋत्विजांना अगणित दक्षिणा मिळते. अवभृथ स्नानासाठी समुद्रावर वा नदी–जलाशयावर जातात. यजमानाने स्नान केल्यानंतर अनेक लोक त्या जलाशयात बुड्या मारतात. तसे केल्याने सर्व पापांचा नाश होतो अशी धारणा आहे."

समुद्रगुप्ताने आपले स्वामित्व सर्वत्र भूषित करावे आणि आपण अजिंक्य बनलेलो सम्राट आहोत या हेतूने अश्वमेध यज्ञ केला होता. समुद्रगुप्ताच्या पूर्वी पुष्यमित्र शुंग, वाकाटक, प्रवरसेन–प्रथम, आणि भारशिव नाग यांनी अश्वमेध यज्ञ केला होता. प्रयागच्या प्रशस्तीलेखात समुद्रगुप्ताला 'गोषतसहस्रप्रदायिनः' म्हणजे एक लक्ष गायींचे दान देणारा असे म्हटलेले आहे. समुद्रगुप्ताच्या अश्वमेधाच्या वेळच्या मुद्रांवर 'अश्वमेध-पराक्रमः' अशी उपाधि कोरलेली आहे. मुद्रेच्या एका बाजूला यज्ञ–यूपाला बांधलेल्या अश्वाची प्रतिमा आहे. तसेच समुद्रगुप्ताची पट्टराणी दत्तादेवी हिचीही प्रतिमा आहे.

□

# रामगुप्त

सम्राट समुद्रगुप्ताच्या पश्चात गुप्त राजवंशात रामगुप्त नावाचा राजा होऊन गेला. परंतु सुमारे ५० वर्षांपूर्वीच इतिहासाला या रामगुप्ताचा पत्ता लागलेला आहे. कारण गुप्त–कालातील उपलब्ध असलेल्या शिलालेखां-मध्ये गुप्त राजवंशाची जी वंशावली दिलेली आहे, तिच्यात समुद्रगुप्तानंतर चंद्रगुप्त-द्वितीय-'विक्रमादित्य' याचा नामोल्लेख केलेला आहे. त्यामुळे आजवर हीच वंशावली प्रमाण मानून इतिहासकार समुद्रगुप्तानंतर विक्रमादित्य हाच सम्राट झाला असे धरून चालले होते. परंतु काही नवीन वाङ्मयीन आणि पुरातत्वीय साधने उपलब्ध झाल्यामुळे तत्कालीन इतिहासावर एक नवीनच प्रकाश पडलेला आहे. या नवीन साधनांवरून आता स्पष्ट झाले आहे की, समुद्रगुप्तानंतर रामगुप्त हा राजा झाला आणि त्याच्यानंतर चंद्रगुप्त–विक्रमादित्य-सिंहासनावर आला.

सुमारे ५० वर्षांपूर्वी 'देवीचन्द्रगुप्तम्' नावाचे एक संस्कृत नाटक

इतिहास संशोधकांच्या हाती आले. दुर्दैवाने हा नाट्यग्रंथ त्याच्या मूळ स्वरूपामध्ये उपलब्ध नाही; परंतु त्यातील बराचसा भाग रामचंद्र आणि गुणचंद्रकृत 'नाट्य दर्पण' ग्रंथात उद्धृत केलेला आहे. हे दोघे विद्वान लेखक प्रसिद्ध हेमचन्द्र पंडिताचे शिष्य होते. हेमचन्द्र हा चालुक्य वंशातील राजा कुमारपाल याचा समकालीन होता. इ. स. ११४३ ते ११७३ या कालखंडात कुमारपालाची राजवट होती. देवीचन्द्रगुप्तम् नाटकातील ही उद्धरणे प्रथमतः सिलव्हॉलेवी नावाच्या विद्वानाने प्रकाशात आणली. त्याच्या मते या लुप्त नाटकातील नायक गुप्तवंशातील चंद्रगुप्त-विक्रमादित्य हाच असावा. देवीचन्द्रगुप्तम् नाटकाची रचना 'मुद्रा राक्षस' नाटकाचा कर्ता विशाखदत्त यानेच केलेली होती. या नाटकात चंद्रगुप्ताचा उल्लेख अनेक ठिकाणी आलेला आहे. एके ठिकाणी तर 'हत्त्वा भ्रातरमेव राज्य हरद्देवी च दीनस्ततः' असा श्लोक असून त्यावरून चंद्रगुप्त-विक्रमादित्याने आपल्या भावाची हत्त्या केली होती, त्याचे सिंहासन बळाने हिसकावून घेतले होते आणि त्याच्या पत्नीशी विवाह केला होता, अशी माहिती उपलब्ध होते. विशाखदत्ताने आपल्या या नाटकात ही घटना विस्तृतपणे लिहिली आहे.

समुद्रगुप्तानंतर राज्यावर आलेला हा रामगुप्त राजा अत्यंत भ्याड आणि नालायक होता. त्याची दुर्बलता लक्षात घेऊन गुप्त वंशाचा प्रबल शत्रू शक-सम्राट याने याच्यावर हल्ला केला आणि रामगुप्ताचा भीषण पराभव केला. त्यावेळी रामगुप्ताने या शक राजाशी तह केला होता. या तहात अनेक अटींबरोबरच शक राजाने रामगुप्ताकडे त्याची लावण्यवती राणी ध्रुवदेवी अथवा ध्रुवस्वामिनी हिचीही मागणी केली होती. रामगुप्ताने दयनीय स्थिती जाणून आणि आपल्या भ्याड स्वभावाला अनुसरून शक राजाची ही अपमानकारक मागणी मान्य केली. परंतु त्याचा धाकटा भाऊ चंद्रगुप्त याला ही अट आपल्या कुळाला कलंक [illegible]

तीव्रतेने वाटले. चंद्रगुप्त शूर वीर आणि साहसी होता. त्याने आपला भाऊ रामगुप्त याला असे करण्यापासून रोखून धरले आणि अशी अपमानकारक अट घालणाऱ्या शक राजाला अद्दल घडविण्याचे ठरविले. त्याने स्वतःच ध्रुवदेवीचा वेश परिधान करून शक राजाकडे जाण्याचे व वध करण्याचे कारस्थान रचले. त्याने आपल्याबरोबर राणीच्या दासी म्हणून असेच दासीवेश धारण केलेले शूर सैनिक बरोबर घेतले. शक राजाने या ध्रुवदेवीला आपल्या महालात सरळ प्रवेश दिला आणि तिच्याजवळ जाऊन शृंगारचेष्टा करू लागला. त्यावेळी ध्रुवदेवी बनलेल्या चंद्रगुप्ताने छपवून आणलेले शस्त्र बाहेर काढले आणि त्याने शक राजाचा वध केला. चंद्रगुप्ताचे कारस्थान सफल झाले. साम्राज्याची आणि कुलाची प्रतिष्ठा त्याने अशा प्रकारे राखली. या साहसपूर्ण घटनेमुळे प्रजेच्या मनात चंद्रगुप्ताविषयी अपार आदर निर्माण झाला होता. महाराणी ध्रुवदेवीलाही आपल्या शीलाचे रक्षण केलेल्या चंद्रगुप्ताविषयी अंतःकरणपूर्वक प्रेम वाटू लागले. आपल्या दुर्बल पतीविषयी तिच्या मनात चीड उत्पन्न झाली होती. प्रजेच्या मनातूनही रामगुप्त उतरला होता. या घटनेनंतर दोन्ही भावांमध्ये झगडे सुरू झाले. चंद्रगुप्ताची लोकप्रियता रामगुप्ताला सहन होईनाशी झाली, तेव्हा हा आपला भाऊच आपली हत्या करील अशी भीती चंद्रगुप्ताला वाटू लागली. म्हणून त्याने साम्राज्याच्या व कुलाच्या रक्षणार्थ रामगुप्ताचाच वध केला आणि स्वतः तो सिंहासनावर बसला. राज्यारोहणानंतर त्याने ध्रुवदेवीशी विवाह केला.

ही घटना इतिहासाला ज्ञात नव्हती; ती विशाखदत्ताच्या नाटकाने ज्ञात झाली.

बाणभट्टाच्या ' हर्षचरित ' ग्रंथातही या घटनेचा उल्लेख आढळतो. ' अरिपुरे च परकलत्रकामुकं कामिनीवेशगुप्तश्चंद्रगुप्तः शकपतिमशातयत् ' -अशा अरिपुरातही दुसऱ्याच्या भार्येसाठी कामुक शक राजाला कामिनी-


वेशधारी चंद्रगुप्ताने ठार केले होते. असे या ग्रंथात म्हटलेले आहे.

दहाव्या शतकातील राजशेखर कवीच्या ‘काव्यमीमांसा’ नामक ग्रंथात एक श्लोक आढळतो, त्याचा आशय असा आहे. ज्या हिमालयावर साहसहीन बनलेल्या आणि निरुपाय झालेल्या शर्मगुप्त नावाच्या राजाने आपली भार्या ध्रुवस्वामिनी हिला खसाधिपतीला देण्याचे वचन दिले होते, त्या हिमालयाच्या गिरी-दरीतून, हे कार्तिकेय! आज यक्ष-किन्नरांचे शब्द निनादत आहेत आणि नगरवधू सामूहिक रीतीने तुझी कीर्ती गात आहेत, तेथे शर्मगुप्त म्हणजे रामगुप्त होय आणि खसधिपती म्हणजे शक राजा होय. या शक राजाचे नाव मात्र कोठेही उपलब्ध झालेले नाही.

काही अभिलेखांमधूनही या घटनेचा उल्लेख आढळतो. संजन येथील ताम्रलेखात कलियुगातील एक दानी गुप्तवंशी राजाने आपल्या भावाची हत्या करून त्याचे राज्य आणि भार्या यांचे अपहरण केले होते, असा उल्लेख आहे. हा ताम्रलेख राष्ट्रकूट वंशातील राजा अमोघवर्ष याच्या कारकीर्दीतील इ. स. ८७१ मधील आहे. ह्यूएनत्संग याने विक्रमादित्याचा उल्लेख एक दानी म्हणजे दानशूर गुप्तवंशी सम्राट, असा केला आहे. इ. स. ९३० मधील खंबात येथील ताम्रलेखातही या घटनेचा उल्लेख आढळतो. अशाच प्रकारे संगली, बीलसड आणि वैशाली येथील अभिलेखांतही उल्लेख आढळतात.

रामगुप्त राजाने फारच थोडा काळ राज्य केले होते. त्यामुळे त्याचे शिलालेख वगैरे उपलब्ध नाहीत. काही मुद्रांवर मात्र राम, रामगु, गुप्त, मगुप्त, अशी अक्षरे आढळतात त्यावरून या मुद्रा पाडणाऱ्या राजाचे नाव रामगुप्त होते असे सिद्ध होते. तसेच या मुद्रांवरील गरुडाच्या प्रतिमेमुळे हा राजा गुप्त वंशातील होता हेही स्पष्ट होते.

□



# चंद्रगुप्त—विक्रमादित्य

रामगुप्ताची हत्या केल्यानंतर चंद्रगुप्त राज्यावर आला. हा दुसरा चंद्रगुप्त, समुद्रगुप्त आणि दत्तदेवी यांचा पराक्रमी पुत्र होता. चंद्र-गुप्ताच्या काळातील बरेच अभिलेख उपलब्ध आहेत. मथुरा, उदगिरी, गढवा, सांची इत्यादी ठिकाणच्या लेखांमध्ये चंद्रगुप्ताविषयीची माहिती मिळते. या लेखावरून चंद्रगुप्ताने केलेला दिग्विजय, तसेच तत्कालीन कला आणि संस्कृती याविषयीची माहितीही मिळते. याच्या कालात मुद्रा पाडण्याच्या कलेत प्रगती झालेली दिसून येते. याने समुद्रगुप्ताच्या मुद्रांप्रमाणेच मुद्रा पाडल्या होत्या आणि काही तर त्याहूनही अधिक मौलिक प्रकारच्या होत्या. त्याच्या सुवर्णमुद्रांवर धनुर्धारी, छत्र, पर्यंक, सिंह—हनन, अश्वारूढ राजा-राणी, ध्वजधारी आणि चक्रविक्रम इत्यादी प्रतिमा रेखलेल्या होत्या. या मुद्रांवरून चंद्रगुप्ताचे व्यक्तित्व, कृती आणि साम्राज्यविस्तार इत्यादी गोष्टींवर महत्त्वपूर्ण प्रकाश पडतो. याच्या मुद्रा

अनेक प्रकारच्या होत्या. तसेच त्यांचा प्रसारही पुष्कळ होता. यावरूनही त्याच्या साम्राज्याचे वैभव आणि उत्कर्ष या गोष्टी लक्षात येतात. गुप्त-वंशातील राजांमध्ये विक्रमादित्यानेच प्रथम चांदीची नाणी पाडली. चंद्रगुप्ताच्या या रजत्-मुद्रा त्याच्या पश्चिमेकडील विजययात्रेची आणि राज्यसीमांची यथार्थ कल्पना देतात. याशिवाय तत्कालीन ताम्रमुद्राही उपलब्ध असून त्यांचे ऐतिहासिक महत्त्व फार आहे.

याच्या राज्यकलासंबंधीचा प्रथम लेख मथुरा येथील स्तंभावर आहे. या स्तंभलेखाची तिथी गुप्त संवत् ६१ (इ. स. ३८० ) अशी दिलेली आहे. हा लेख त्याच्या राज्यरोहणानंतर पाचव्या वर्षी खोदलेला आहे 'राज्यसंवत्सरे पंचमे' या उल्लेखावरून असे स्पष्ट होते की, चंद्रगुप्ताचा राज्याभिषेक गुप्त-संवत् ५६ (इ. स. ३७५) मध्ये झाला होता.

चंद्रगुप्ताला आणखीही काही नावे होती. सांची येथील लेखांमध्ये त्याचे 'प्रिय नाम देवराज' होते असे म्हटले आहे. दुसऱ्या प्रवरसेनाच्या चमक येथील प्रशस्तीलेखांमध्ये प्रभावती गुप्ता हिला महाराजाधिराज श्रीदेवगुप्त याची कन्या असे म्हटले आहे. यावरून असे स्पष्ट होते की, 'देवदत्त' असे एक नाव चंद्रगुप्ताला होते. काही मुद्रांवर याला 'देवश्री' असेही म्हटलेले आहे. अभिलेख आणि विविध मुद्रा यावरून याला नरेन्द्र-चन्द्र, सिंह-चन्द्र, नरेन्द्रसिंह, सिंहविक्रम, विक्रम, विक्रमान्क, विक्रमादित्य आणि रूपाकृति अशा गौरवपूर्ण पदव्या होत्या हे स्पष्ट होते. या पदव्यांवरून त्याची महानता आणि त्याचा राजकीय प्रभाव लक्षात येतो.

वैवाहिक संबंध प्राप्त करून राजकीय कार्य सुकर करणे, अशी एक नीति गुप्त-वंशातील राजांमध्ये दिसते. प्राचीन काळी अनेक राजे राजकीय उद्देशाने विवाहसंबंध जोडत असत. चंद्रगुप्त विक्रमादित्यानेही या नीतीचा अवलंब केलेला होता.

नाग-वंशाचा राजकीय इतिहास गुप्त-वंशाहूनही प्राचीन होता. हे राजे शक्तीशालीही होते. नागांच्या भिन्न भिन्न शाखा पद्मावती, विदीशा, मथुरा आणि अहिच्छत्र येथे राज्य करीत होत्या. त्या काळी ही प्रमुख ऐतिहासिक केंद्रेच होती. प्रयागच्या प्रशस्तीलेखानुसार समुद्रगुप्ताला नागदत्त, गणपतिनाग, नागसेन, अच्युत आणि नंदी इत्यादी राजांबरोबर युद्ध करावे लागले होते. हे सर्व राजे नागवंशी होते. त्यावेळी या राजांचा जरी पराभव झाला होता तरी नागवंशाचा समूळ विनाश झालेला नव्हता. या वंशाशी आपले संबंध दृढ करण्याच्या उद्देशाने दुसऱ्या चंद्रगुप्ताने नाग वंशातील राजकुमारी कुबेरनागा हिच्याशी विवाह केला होता. हिच्या पोटीच प्रभावतीगुप्ता नावाची राजकन्या जन्मलेली होती.

वाकाटक वंशातील राजे दक्षिणापंथाचे शासक होते. हे राजेही शक्तीशाली होते. चंद्रगुप्त–विक्रमादित्याने आपली कन्या प्रभावतीगुप्ता हिचा विवाह रुद्रसेन–द्वितीय या वाकाटक वंशातील राजाशी करून दिला होता. या संबंधामुळे वाकाटकांची सहानुभूती आणि मैत्री चंद्र-गुप्ताने जोडली होती. शकांशी झालेल्या युद्धात वाकाटकांनी गुप्तांना बरीच मदत केलेली होती. रुद्रसेन अल्पवयातच निधन पावला. त्यावेळी त्याची दोन्ही मुले लहान होती, म्हणून प्रभावतीगुप्ता हिलाच वाकाटक वंशाचे राज्य सुमारे वीस वर्षे सांभाळावे लागले होते. या कालावधीत तिने आपला पिता चंद्रगुप्त-विक्रमादित्य याच्या उचित मार्गदर्शनानुसार राज्यकारभार केला.

दक्षिण भारतातील प्रतिष्ठित अशा राजवंशात कदम्ब वंशाचीही गणना होत होती. कदम्ब हा एक ब्राह्मणवंश होता आणि कुन्तल प्रदेशावर या राजांचे राज्य होते. म्हणून प्राचीन साहित्यामध्ये यांना ‘कुन्तलेश्वर’ असे म्हटलेले आहे. चंद्रगुप्त-विक्रमादित्याने या वंशाशी विवाहसंबंध प्रस्थापित केला होता. काकुस्थवर्मा नावाच्या कदम्बवंशातील राजाच्या

कन्येशी गुप्त वंशातील युवराज कुमारगुप्त-प्रथम याचा विवाह झाला होता. अशाप्रकारे दक्षिणेतील राजवंशाशी वैवाहीक संबंध स्थापन केल्यामुळे चंद्रगुप्त-विक्रमादित्याची कीर्ती दक्षिणेमध्ये सर्वत्र प्रसरलेली होती. मेहरोली येथील अभिलेखात असे म्हटले आहे की, " सम्राट चंद्राच्या प्रताप-सौरभाने दक्षिण समुद्रदेखील सुवासित होऊन गेला."

चंद्रगुप्त-विक्रमादित्याची गणना भारतातील सुप्रसिद्ध अशा विजेत्यां-मध्ये केली जाते. त्याने आपला पिता समुद्रगुप्त याच्याप्रमाणेच विलक्षण शौर्य, उत्साह आणि सैन्यबळावर दिग्विजय प्राप्त केला. उदगिरी येथील गुहालेखामध्ये या संदर्भात चंद्रगुप्ताला 'कृत्स्नपृथ्वीजय' म्हणजे जगज्जेता असे म्हटलेले आहे. चंद्रगुप्त हा 'अखंड भारताचा एकराट सम्राट' बनला होता, असे या उल्लेखावरून लक्षात येते. समुद्रगुप्ताच्या प्रयाग येथील प्रशस्तीलेखाप्रमाणे चंद्रगुप्ताच्या दिग्विजयाचे सविस्तर वर्णन करणारा लेख उपलब्ध नाही.

उत्तर–दक्षिण भारतातील राजांना चंद्रगुप्ताने जिंकून घेतले होतेच; पण शकांचाही त्याने बंदोबस्त केला होता. त्याच्या या पराक्रमाचे वर्णन स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी 'सहा सोनेरी पाने' या आपल्या ग्रंथात केले आहे. त्यांनी म्हटले आहे, " शकांचा असा पूर्ण मोड होताच त्याच्या हाती त्या वेळी असलेल्या सिंध, कच्छ, सौराष्ट्र, गुजराथ, माळवा इत्यादी प्रांतांना स्वतंत्र करून सम्राट चंद्रगुप्ताने आपल्या भारतीय साम्राज्यात समाविष्ट केले. शक राजांचा असा समूळ उच्छेद केल्यानंतर त्यांची तोवर जी राजधानी होती त्या प्राचीन नि प्रख्यात उज्जयिनी नगरात सम्राट चंद्रगुप्ताने जेव्हा विजयप्रवेश केला तेव्हा तेथे मोठा राष्ट्रीय महोत्सव साजरा करण्यात आला. सम्राट चंद्रगुप्ताने 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली. पूर्वीपासून तिकडे चालत आलेल्या मालव संवतालाच शकांचा समूळ उच्छेद करणाऱ्या ह्या महान विजयाच्या स्मरणार्थ आपले नाव

देऊन ' विक्रम संवत् ' चालू केला. त्याने उज्जयिनीलाच आपल्या भारतीय साम्राज्याच्या पश्चिम भागाची राजधानी केली आणि तेथेच तो सिंहासनारूढ होऊन वास्तव्य करू लागला.

' विक्रमादित्याने म्लेंच्छावर मिळविलेल्या ह्या विजयामुळे साऱ्या भारताला जी धन्यता वाटली ती काय वर्णावी ? परकीयांच्या हातून सारा भारत स्वतंत्र होऊन तो आपल्या एकछत्र साम्राज्यात ' एकराट ' झाला. शक-कुशाणांचा नाश करण्यासाठी १५०–२०० वर्षे लढत आलेल्या यौधेय, मालव, त्रिलिनयांकुर शातवाहनप्रभृती अनेक वीरविरांच्या आणि त्यांच्या स्वतःच्या पितृपितामहांच्या पराक्रमाचे, यशापयशाचे राष्ट्रीय आशाआकांक्षाचे शेवटी सार्थक झाले; ते पाहून स्वतः विक्रमादित्यालाही किती धन्यता वाटली असेल !

" शकांनी वैदिक धर्म, संस्कृत भाषा आणि भारतीय आचार-विचार ह्यांना अंगीकारले होते. विक्रमादित्याने त्याच्या राजसत्तेचेही आता आपल्या खड्गबळाने उन्मूलन केल्यामुळे त्यांच्या ' शकपणाचे ' असे भारतीयांपासून भिन्न अस्तित्व मुळातच नाहीसे झाले. दोन-तीन पिढ्यांच्या आतच शक असा कुशाणांप्रमाणेच त्या भारतीय जगतात कोणीही उरला नाही.

" भारतवर्षात ऐतिहासिक कालामध्ये अनेक सम्राट होऊन गेले, पण शक-कुशाणांचा अंत करणाऱ्या ह्या सम्राट विक्रमाइतका लोकप्रिय सम्राट क्वचितच कोणी झाला असेल. त्याच्या राजवटीत फाहियान नावाचा जो चिनी प्रवासी आला होता, त्या परकीयानेही त्याच्या साम्राज्यात भारतीयांच्या वैभवाचा, सुखाचा, संपन्नतेचा, नि संतोषाचा कसा कळस झाला होता हे वर्णिलेले आहे. भारताच्या सर्व भागांतील खेड्यापाड्यांतूनसुद्धा आख्यायिकांतून नि लोकगीतांतून आजही ' राजा विक्रमाचे ' नाव नि त्याची न्यायप्रवीणता मोठ्या प्रेमाने संकीर्तिली जात आहे."

चंद्रगुप्ताने अश्वमेध यज्ञ केला होता याचा उल्लेख कोठेही आढळत नाही. परंतु त्याच्या उपलब्ध झालेल्या मुद्रांवरून त्याने ' विक्रमांक–विक्रमादित्य ' अशी गौरवउपाधी धारण केली होती, हे निश्चित कळते. शक विजयानंतरच ही उपाधी त्याने स्वत:ला घेतली असावी. विक्रमादित्य या पदवीचा अर्थ आहे, ' सूर्याप्रमाणे तेजस्वी '. गुप्त वंशातील हा पाचवा सम्राट आपल्या अंगच्या पराक्रमाने खरोखरच तेजस्वी होऊन गेला यात शंका नाही.

चंद्रगुप्त विक्रमादित्य हा रसिकही होता. त्याच्या साम्राज्यातील पाटलीपुत्र आणि उज्जयिनी ही दोन नगरे म्हणजे मोठी सांस्कृतिक केंद्रेच होती. फाहियान ह्या चिनी प्रवाशाने लिहिले आहे की, पाटलीपुत्रातील राजप्रासाद पाहिल्यावर असा भास होत असे की, जणु प्रत्यक्ष देवांनीच त्याची निर्मिती केलेली आहे. ' मुद्राराक्षस ' नाटकात या नगरीतील प्राकार आणि नगरद्वारांचा उल्लेख आलेला आहे. ज्यावेळी शत्रूसैन्य नगरीवर आक्रमण करत असे, त्यावेळी तिच्या रक्षणार्थ धनुर्धारी योद्धे चोहोबाजूला उभे रहात असत. नगरद्वारांच्या पुढे भयंकर अशा हत्तींची झुंड उभी केली जात असे. नगरीत प्रवेश करणाऱ्या शत्रूसैन्याचा हे हत्तीच प्रथम नाश करीत असत.

उज्जयिनी येथे चंद्रगुप्त विक्रमादित्याची दुसरी राजधानी होती. कालिदास हा महाकवी या नगरीत रहात असे. कालिदासाने या नगरीचे वर्णन आपल्या ' मेघदूत ' नामक काव्यात केलेले आहे. ही नगरी म्हणजे कांतीयुक्त अशा स्वर्गाचाच एक भाग आहे, तिचा उपभोग घेण्यासाठी सदाचरणी देव आपल्या पुण्यसंचयाच्या बळावर स्वर्गातून पृथ्वीवर येथे येत असत, असे कालिदासाने वर्णिलेले आहे. ' मृच्छकटिक ' या नाटकात वर्णिल्याप्रमाणे या नगरीत विविध विहार, आरामगृहे, देवालये, सरोवरे, कूप आणि यज्ञयूप होते. त्यामुळे ह्या नगरीची शोभा अलौकिक अशी

होती. 'कथासरित्सागर' या ग्रंथात म्हटले आहे की, उज्जयिनी ही नगरी पृथ्वीचे भूषण होती. अमृताच्या फेसाप्रमाणे शुभ्र असे तेथील विलक्षण सौंदर्यशाली प्रासाद होते की, यामुळे स्वर्गही लज्जित होऊन जावा.

चंद्रगुप्त विक्रमादित्याची शासनव्यवस्था उत्कृष्ट अशीच होती. त्याने स्वतःला महाराजाधिराज, महाराजराजाधिराज, परमभट्टारक, परमदैवत आणि परमभागवत अशा विविध प्रकारच्या पदव्या घेतलेल्या होत्या. साम्राज्याचा तो सर्वोच्च पदाधिकारी होता. त्याच्या मदतीसाठी एक मंत्रिमंडळ होते. राज्यव्यवस्थेसाठी साम्राज्याचे प्रांत पाडलेले होते. प्रांतांना 'भुक्ति' असे म्हटले जात असे. या भुक्तीचा सर्वोच्च पदाधिकारी राजकुमार असे. बसाढ येथील लेखानुसार गोविंदगुप्त नावाचा राजकुमार तीरभुक्तीचा राज्यपाल होता. तीरभुक्तीची राजधानी वैशाली येथे होती.

'कुमारामात्य' या नावाचा अधिकारी राजकुमाराचा मंत्री असे. तो जिल्हाधिकारीही असे. 'बलाधिकृत' हा 'सेनानायकाचा हुद्दा असे.' 'रणभांडारधिकृत' हा अधिकारी सैन्यासाठी लागणाऱ्या सामग्रीची व्यवस्था करीत असे. 'दंडपाशाधिकृत' हा संरक्षण विभागाचा मोठा अधिकारी असे. मुख्य न्यायाधीशाला 'महादंडनायक' म्हटले जाई. अशाप्रकारे राज्यकारभाराची व्यवस्था केलेली होती. फाहियानने चंद्रगुप्ताच्या राज्यव्यवस्थेची प्रशंसा केलेली आहे.

चंद्रगुप्त विक्रमादित्य हा वैष्णव पंथाचा स्वाभिमानी होता. अश्वारूढ मुद्रांवर 'परम भागवत' अशी याची उपाधि आढळते. विष्णू या देवतेवर याची प्रगाढ भक्ती होती. विष्णुपद नावाच्या पर्वतावर याने विष्णुध्वजाची स्थापना केली होती. याच्या मुद्रांच्या पृष्ठभागावर विष्णूचे वाहन गरुड याची प्रतिमा आहे. उदयगिरी येथील गुंफामध्ये वैष्णव मूर्तींच्या प्रतिमा आहेत.

चंद्रगुप्त विक्रमादित्य हा स्वतः वैदिक धर्मी होता तरी अन्य धर्मांकडे

पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन उदार होता. याच्याकाळी सर्व धर्मांचाच विकास झालेला दिसतो. फाहियाननेही याच्या धर्मसहिष्णुतेची प्रशंसा केलेली आहे. याच्याकाळी मथुरेमध्ये शैवधर्माचा विकास बराच झालेला होता. वीरसेन नावाचा याचा एक सेनापती शैव होता. याने उदयगिरीवर शिवभक्तीने प्रेरित होऊन एक गुहा निर्माण केली होती. एका वैष्णव सम्राटाने एका शैवाला एवढ्या उच्च पदावर नियुक्त करावे हे त्या सम्राटाच्या धार्मिक सहिष्णुतेचेच एक द्योतक आहे. विक्रमादित्याच्या दरबारातील महाकवी कालिदास हा शैवच होता. त्यावेळी उज्जयिनी-मध्ये शैवलोक बहुसंख्य होते. तेथील महाकालाचे मंदिर विख्यात होते. बौद्धांचे अनेक विहार ठिकठिकाणी होते; त्याचप्रमाणे जैनांची मंदिरेही होती.

चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या काळी समाजाची आर्थिक अवस्था संतोष-जनक होती. व्यापार-उद्योग भरभराटलेले होते. परदेशाशीही व्यापारी संबंध होते. पश्चिमेकडील व्यापार भृगुकच्छ आणि पूर्वेकडील व्यापार ताम्रलीप्ति या प्रदेशातील बंदरांमधून होत असे. कालिदासानेही म्हटले आहे की, आमच्या देशातील व्यापारी पूर्वेकडील द्वीपसमूहांमध्ये व्यापारा-साठी जात असत आणि ते तेथून मसाले आणीत असत. देशातील विविध व्यापारपेठाही गजबजलेल्या होत्या आणि या व्यापारीकेंद्रांचे सतत दळणवळण चालत असे. बसाढ येथील एका लेखांवरून स्पष्ट होते की, त्यावेळी प्रसिद्ध अशा नगरांमधून व्यापारी आणि कारागीर यांच्या संघटना अस्तित्वात होत्या. त्यांना ‘ निगम ’ असे म्हटले जात असे. आर्थिक समृद्धीच्या दृष्टीने आणि व्यापारवृद्धीच्या हेतूनेच ह्या निगम नावाच्या समित्या स्थापन झालेल्या होत्या. याच लेखात ‘ श्रेष्ठ-निगम ’ म्हणजे नगरातील पुंजीपतींची आर्थिक समिती, ‘ कुलिक-निगम् ’ म्हणजे कारागिरांची आर्थिक समिती, ‘ सार्थवाह-निगम ’ म्हणजे नगरातील

व्यापाऱ्यांची समिती; अशा विविध समित्यांचा उल्लेख आढळतो.

निगम-समित्या म्हणजे आधुनिक काळातील बँकाच होत्या. बँकांचेच काम ते करीत असत. सांची येथील लेखानुसार काकनादबोट येथे एक समिती होती, तिचे नाव 'आर्यसंघ' असे होते. आम्रकार्द्दव नावाच्या एका पदाधिकाऱ्याने या आर्यसंघाजवळ पंचमंडळींकडे पंचवीस सुवर्णाचे दिनार जमा केलेले होते. त्यांच्या व्याजातून काकनादबोट येथील 'श्रीमहाविहार' नावाच्या मठामधील श्रमणांना दररोज भोजन आणि रत्नगृहामध्ये नंदादीप याच्यासाठी खर्च होत असे. जोवर चंद्र-सूर्य विद्यमान आहेत तोवर ही व्यवस्था चालू रहावी, असे या लेखात म्हटले आहे. गुप्त-संवत् ८८ मधील गढवा येथील लेखातही आर्थिक समितीच्या जवळ दहा दिनार जमा केल्याचा उल्लेख आहे. हे द्रव्य पाटलीपुत्रातील एका नागरिकाने धर्मार्थ दान म्हणून दिलेले होते.

चंद्रगुप्त-विक्रमादित्याच्या अभिलेखात त्याच्या महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांची आणि सामन्तांची नावे उपलब्ध आहेत.

वीरसेन—हा पाटलीपुत्राचा नागरिक ( पाटलीपुत्रकः ) आणि सान्धिविग्रहिक अमात्य होता. त्याने परंपरेनुसार सचिव-पद प्राप्त केलेले होते. हा चंद्रगुप्त विक्रमादित्याबरोबर त्याच्या शक-चढाईच्या संबंधात पूर्व माळव्यात भिलसा येथे थांबलेला होता. तेथे त्याने शैवांच्या निवासासाठी एक गुहा निर्माण केलेली होती. त्याचे वास्तविक नाव शाब आणि कुलनाम वीरसेन होते.

शिखरस्वामी—याला कर्मदाण्डा येथील शिवलिंग प्रशस्तीमध्ये चंद्रगुप्ताचा कुमारामात्य आणि मंत्री म्हटलेले आहे. या अभिलेखात त्याचा पुत्र पृथ्विषेण याचा उल्लेख आलेला असून तो पहिल्या कुमारगुप्ताचा कुमारामात्य आणि मंत्री होता.

आम्रकार्द्दव—याचा उल्लेख सांची येथील लेखात आलेला आहे. हा

सुकुलि देशातील रहाणारा होता. अनेक युद्धांत विजय मिळविल्यामुळे याची कीर्ती सगळीकडे पसरलेली होती. यावरून हा कोणी श्रेष्ठ असा सैन्यातील पदाधिकारी असावा असे दिसते. याने काकनादबाट म्हणजे सांची येथील महाविहाराला दान दिले होते.

गोविन्दगुप्त—हा तीरभुक्तीचा राज्यपाल होता. याची राजधानी वैशाली नगरीत होती. बसाढ येथील मुद्रालेखांमध्ये चंद्रगुप्त आणि ध्रुवस्वामिनी यांचा हा पुत्र आहे, असे म्हटलेले आहे.

सनकानीक महाराजे—याने गुप्त संवत्–८२ म्हणजे इ.स. ४०१ मध्ये पूर्व माळव्यात चंद्रगुप्त विक्रमादित्याचे आधिपत्य स्वीकारले होते. प्रयाग येथील प्रशस्तीलेखात म्हटले आहे की, त्या आधी सनकानीक समुद्रगुप्ताला करभाग देत असे. उदयगिरी येथील गुहालेखांमध्ये सनकानीक महाराजाला महाराजच्छगलग याचा पौत्र आणि महाराज विष्णुदास याचा पुत्र असे म्हटलेले आहे. या लेखातील भाषेवरून हा चंद्रगुप्त विक्रमादित्याचा परम भक्त होता असे दिसते. चंद्रगुप्ताने शकांशी केलेल्या युद्धात याने भाग घेतलेला असावा.

महाराज श्रीविश्वामित्रस्वामी—याचे नाव बेसनगर येथे सापडलेल्या एका नाण्यावर रेखलेले आढळते. त्यावरून हा चंद्रगुप्त विक्रमादित्याचा सामन्त असावा असे दिसते.

चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीमध्ये मुद्रा शास्त्राच्या इतिहासात एक नवीन युग आल्यासारखे दिसते. यांच्यापूर्वी कोणाही अन्य हिंदू सम्राटाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुवर्णमुद्रा काढलेल्या नव्हत्या. पाटलीपुत्र आणि उज्जयिनी अशा दोन नगरांत यांच्या टाकसाळी होत्या. ह्या मुद्रांवरून याच्या साम्राज्याच्या ऐश्वर्यावर आणि शक्तीवर प्रकाश पडतो आणि त्याचबरोबर याच्या व्यक्तित्वामधील भिन्न भिन्न पैलूंविषयीदेखील महत्त्वाची माहिती मिळते. याच्या सुवर्ण मुद्रा आठ प्रकारच्या होत्या :

धनुर्धरांकित मुद्रा : चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या या मुद्रा सर्वांत अधिक उपयोगात होत्या. बयाना कोशातील ९७३ मुद्रांमध्ये ७९८ मुद्रा धनुर्धरांकित वर्गातील आहेत. अशाच प्रकारच्या मुद्रा कलकत्ता येथील संग्रहालयात २८ आणि ब्रिटिश संग्रहालयात २९ अशा आहेत. यांचे वजन १९१ ग्रॅम, १२४ ग्रॅम आणि १२७ ग्रॅम असे आढळते. या मुद्रांच्या पुढील भागावर सम्राटांची प्रतिमा आणि गरुडध्वज रेखलेला आहे. सम्राटांच्या हातात धनुष्यबाण आहे. वरती 'देवश्रीमहाराजाधिराजश्री चंद्रगुप्तः' असा वर्तुळाकार लेख आहे. पृष्ठभागी काही मुद्रांवर सिंहासनाधिष्ठित लक्ष्मीची प्रतिमा आहे. तिच्या डाव्या हातात कमळ आणि उजव्या हातात पाश आहे. 'श्रीविक्रमः' अशी सम्राटांची उपाधि रेखलेली आहे. काही मुद्रांच्या पृष्ठभागी देवी कमळावर बसलेली आहे.

'सिंह-निहन्ता' : या प्रकारच्या मुद्रा अधिक कलात्मक दिसतात. याचे वजन १३० ग्रॅम भरते. यांच्या पुढच्या भागावर सम्राट धनुष्यबाणाने अथवा तलवारीने सिंहाला मारीत असल्याचे दाखवलेले आहे. समुद्रगुप्ताने 'व्याघ्रहनन' प्रतिमेच्या मुद्रा काढलेल्या होत्या. तशाच प्रकारच्या चंद्रगुप्ताने सिंहहनाच्या मुद्रा काढलेल्या होत्या. या प्रकारच्या मुद्रांच्या पृष्ठभागी सिंहावर बसलेली देवी दाखवलेली आहे. वाहनावरून ही दुर्गादेवीची आकृती असावी असे दिसते. यातही तीन प्रकारच्या मुद्रा आढळतात. पहिल्या प्रकारात सम्राट आणि सिंह यांचे द्वंद्व रेखलेले आहे. दुसऱ्या प्रकारात राजा सिंहाला आपल्या पायाने तुडवताना दाखविलेला आहे, आणि तिसऱ्या प्रकारात सम्राटांच्या भयाने सिंह आक्रन्दत पळत असलेला दाखविलेला आहे. या मुद्रांवरून चंद्रगुप्त विक्रमादित्याला शिकारीची अत्यंत आवड होती असे दिसते. या प्रकारच्या मुद्रांवर 'नरेन्द्रचन्द्र', 'अजेय', 'सिंहविक्रम' अशा सम्राटांच्या विविध

उपाधि आढळतात.

अश्वारूढ मुद्रा : चंद्रगुप्ताने या नवीन प्रकारच्या मुद्रा पाडलेल्या होत्या. हा सम्राट अश्वारोहणात निपुण होता असे यावरून दिसते. या मुद्रांच्या पुढच्या भागावर सम्राट चंद्रगुप्त अश्वारूढ दाखविलेला आहे. आणि त्यांच्या वरती वर्तुळाकारात 'परमभागवत महाराजाधिराजश्रीचंद्रगुप्तः' अशी अक्षरे रेखलेली आहेत. पृष्ठभागावर प्रभामण्डलाने युक्त अशा लक्ष्मीची प्रतिमा दिसते. तिच्या एका हातात कमळ आणि दुसऱ्या हातात पाश आहे.

छत्रमुद्रा : चंद्रगुप्त विक्रमादित्याने प्रवर्तित केलेल्या नवीन प्रकारच्या मुद्रांमध्ये छत्रमुद्रा येतात. या मुद्रांच्या पुढल्या भागावर सम्राट यज्ञवेदींमध्ये आहुति देताना दाखविलेले आहे. त्याच्यामागे एक सेवक सम्राटांच्या शिरावर छत्र धरून उभा आहे. वर्तुळाकारात 'महाराजाधिराजश्रीचंद्रगुप्तः' अशी अक्षरे रेखलेली आहेत. मुद्रांच्या पृष्ठभागी कमळावर उभ्या असलेल्या लक्ष्मीचे चित्र आहे. लक्ष्मीच्या उजव्या हातात जपमाला असून डाव्या हातात कमळ आहे. पद्मधारिणी लक्ष्मीचा उल्लेख प्राचीन भारतीय साहित्यात बराच केलेला आढळतो.

पर्यंकमुद्रा : समुद्रगुप्ताच्या वीणावादन मुद्रांचे हे अनुकरण आहे. या मुद्रांच्या पुढील भागावर सम्राट वस्त्र आणि आभूषणे यांनी सुसज्जित होऊन पर्यंकावर बसलेला आहे, असे चित्र आढळते. या प्रकारच्या काही मुद्रांवर पर्यंकाच्या खाली 'रुपाकृति' अशी सम्राटाची पदवी रेखलेली आहे. यावरून विक्रमादित्याच्या सुंदर व्यक्तिमत्वाचा बोध होतो. या मुद्रांच्या पृष्ठभागावर सिंहासनारूढ देवी दाखविलेली आहे. तिच्या डाव्या हातात कमळ असून उजवा हात रिक्त दाखविलेला आहे. 'श्रीविक्रमः' अशी सम्राटाची उपाधि रेखलेली आहे.

पर्यंकस्थित राजाराणी मुद्रा : या प्रकारातील केवळ एकच मुद्रा

सापडलेली आहे. अयोध्येपासून २५ मैल अंतरावरील बदौली नावाच्या खेड्यात ही मुद्रा मिळालेली आहे. या मुद्रेच्या पुढील भागावर सम्राट प्रभामण्डलाने युक्त असा लांब कोट आणि पायजमा घातलेला दाखविलेला आहे. पृष्ठभागावर प्रभामण्डळयुक्त–राजाराणी पर्यंकावर बसलेले दाखवलेले आहेत. ' श्रीविक्रमः ' अशी सम्राटाची उपाधीही अंकित केलेली आहे.


ध्वजधारी मुद्रा : या प्रकारातील मुद्रा एकच सापडलेली आहे. काशी विद्यालयातील कलाभवनात ती ठेवलेली आहे. या मुद्रांच्या पुढील भागावर प्रभामण्डलयुक्त सम्राट कोट, पायजमा घातलेला आणि अलंकार घातलेला दाखविलेला आहे. मुद्रेच्या पृष्ठभागावर ' परमभागवत ' अशी उपाधि अंकीत केलेली आहे. गुप्त-वंशातील राजांमध्ये चंद्रगुप्त विक्रमादित्यानेच ही उपाधि धारण केलेली होती.

चक्रविक्रम मुद्रा : या प्रकारचीदेखील केवळ एकच मुद्रा उपलब्ध आहे. या मुद्रेचे वैशिष्ट्य म्हणजे सम्राटाचे नाव रेखलेले नाही. ' चक्रविक्रम ' अशी अक्षरे पृष्ठभागी रेखलेली आहेत. मुद्रेच्या पुढल्या भागावर भगवान विष्णूची प्रतिमा चित्रित केलेली आहे.

रजत मुद्रा—गुप्त वंशात सर्वांत प्रथम चंद्रगुप्त विक्रमादित्यानेच रजतमुद्रा प्रचारात आणल्या. या मुद्रा बऱ्याच उपलब्ध झालेल्या आहेत. चांदीच्या मुद्रांप्रमाणेच ताम्रमुद्राही उपलब्ध आहेत.

या मुद्रेच्या पृष्ठभागी कलशाचे चित्र दिसते. भारतीय कलाकृतीमध्ये पूर्ण कलशाच्या प्रतिमेला महत्त्वपूर्ण असे स्थान दिलेले आढळते. गुप्तकालीन देवालयीन स्थापत्यामध्येदेखील कलशाच्या शुभाकृतींचे चित्रण सर्वत्र आढळते.

□



# फाहियानचे प्रवासवर्णन

चंद्रगुप्त विक्रमादित्याचे काळातील सांस्कृतिक परिस्थितीचे विवरण फाहियान या चिनी यात्रिकाच्या प्रवासवर्णनात आढळते. फाहियान याचा जन्म चीनमधील वु-यंग नावाच्या गावी झाला होता. त्याचा पिता बौद्ध धर्माचा अभिमानी होता. आपल्या मुलालाही बौद्ध धर्माची दीक्षा देण्याची त्याची इच्छा होती. फाहियानला तीन मोठे भाऊ होते; परंतु ते अल्पायुषी ठरले. त्यामुळे फाहियानचे पालनपोषण त्याच्या मातापित्याने अतिशय काळजीपूर्वक केले होते. एकदा फाहियानही आजारी पडला आणि तो वाचण्याची आशा उरली नाही. तेव्हा त्याच्या पित्याने त्याला जवळच्याच एका बौद्ध मठात नेऊन ठेवले. तेथे त्याने हळूहळू भिक्षूंची सेवा केली आणि त्यातून तो पूर्ण बरा झाला. तो बौद्ध मठातच राहू लागला. तथागत बुद्धाविषयी त्याला परमभक्ती वाटू लागली. त्याने आपल्या कुटुंबाचा त्याग केला आणि बौद्ध-श्रमणाचे जीवन स्वीकारले.

त्याने बौद्ध ग्रंथांचे अध्ययनही केले. पुढे त्याला तथागत बुद्धाच्या जन्मभूमीचे दर्शन घेण्याची उत्कट इच्छा झाली. भारतातील बौद्ध तीर्थांचे दर्शन घेऊन आपला आत्मा आणि नेत्र संतुष्ट करावेत असे त्याला वाटू लागले. 'विनयपिटक' नावाच्या बौद्ध ग्रंथाची एक प्रत मिळविण्याची त्याची फार फार इच्छा होती.

इ. स. ३९९ मध्ये आपल्या काही मित्रांच्याबरोबर फाहियान याने भारतयात्रेचे प्रस्थान ठेवले. त्याच्या मित्रांमध्ये हुई-चिंग, ताओ-चेंग, हुइ-यिंग आणि हुइ-वेइ हे उल्लेखनीय साथी होते. यात्रा जसजशी पुढे जाऊ लागली, तसतसे वाटेत आणखी काही भारताकडे जाणारे चिनी यात्रेकरू त्यांना भेटले. चिह-येन, हुइ-चियेन, सोंग-शाओ, पाओ-युन आणि सेंगचिंग इत्यादी यात्रिक त्यांना भेटले.

प्रथमतः फाहियान शनशन येथे पोचला. या ठिकाणी त्याला भारतीय संस्कृतीचा बराच प्रभाव असलेला दिसून आला. या ठिकाणी त्यावेळी सुमारे ४००० बौद्ध भिक्षू राहात होते. येथे भिन्नभिन्न भारतीय धर्मांचे लोक होते.

त्यानंतर फाहियान दुर्गम अशी यात्रा करीत आपल्या मित्रांच्या बरोबर करशहर येथे पोचला. येथील बौद्ध मठांमधून हीनयान पंथातील बौद्ध भिक्षू राहात होते.

त्यानंतर फाहियान नदी-नाले, दुर्गम पहाड ओलांडीत खोतान येथे पोचला. त्यावेळी तेथे प्रचंड असे चौदा बौद्धमठ अस्तित्वात होते. त्यांतील सर्वांत मोठ्या मठाचे नाव होते 'गोमतीविहार'. या विहारात महायान पंथाचे ३००० बौद्ध भिक्षू राहात होते. त्यांचे जीवन संयमित आणि आदर्श असे होते. त्यांचे भोजन, विश्रांती आणि अध्ययन इत्यादी निश्चित वेळीच चालत असे. खोतानमध्ये गोमतीविहाराच्या जवळच २५० फूट उंचीचा दुसरा एक मोठा विहार बांधलेला होता. तीन पिढ्यांतील राजांनी

८० वर्षांत ही वास्तू बांधलेली होती. हा विहार सुवर्ण, रजत इत्यादी प्रकारच्या बहुमूल्य धातूंनी जडवलेला होता.

खोतान येथे काही दिवस राहिल्यानंतर फाहियान काशगर येथे पोचला. तेथील राजा बौद्धधर्माचा अनुयायी होता. ज्यावेळी फाहियान तेथे पोचला, त्यावेळी तेथील राजाने 'पंच–परिषद' भरवून तिच्यापुढे श्रमणांना उपयुक्त अशा वस्तू दान दिल्या होत्या. या ठिकाणी एक हजार हीनयान पंथातील बौद्ध भिक्षू राहात होते.

काशगरनंतर प्रवासातील भयंकर संकटांना तोंड देत फाहियान पुष्कलावती येथे पोचला. सम्राट अशोकाचा पुत्र धर्मवर्धन याने या ठिकाणी पूर्वी राज्य केले होते. बोधिसत्वाने याच ठिकाणी एका व्यक्तीला आपले डोळे दिले होते. या ठिकाणी हीनयान पंथाच्या अनुयायांची संख्या बरीच मोठी होती. या ठिकाणी त्यावेळी असलेल्या एका प्रचंड स्तूपाचा उल्लेख फाहियानने केलेला आहे. सुवर्ण, रजत या धातूंनी हा स्तूप जडवलेला होता. तेथून पूर्वेकडे पाच दिवसांच्या प्रवासानंतर फाहियान तक्षशिलेला पोचला. चिनी परंपरेनुसार या ठिकाणी बोधिसत्वाने आपले शिर कापून एका व्यक्तीला ते दान दिले होते. म्हणून चिनी लोक तक्षशिला याचा अर्थ 'कटासीर' असा समजत होते. या नगरीमध्ये बहुमूल्य धातूंनी जडवलेला एक विशाल स्तूप होता. देशोदेशीचे सम्राट, मंत्री आणि धनिक व्यक्ती याची पूजा करण्यामध्ये स्पर्धा करीत असत.

तक्षशिलेला काही दिवस राहिल्यानंतर फाहियान दक्षिणेकडे निघाला आणि चार दिवसांच्या प्रवासानंतर तो पुरुषपूर येथे पोचला. देवपुत्र कनिष्काने बांधलेला प्रसिद्ध स्तूप तेथे त्यावेळी विद्यमान होता. हा स्तूप सुमारे ४०० फूट उंचीचा होता. सुरम्यता आणि ऐश्वर्य या दृष्टीने हा स्तूप अद्वितीयच होता. फाहियानने या स्तूपाचीच सर्वांत अधिक प्रशंसा

केलेली आहे.

येथपर्यंतच्या प्रवासात हुइ-चिंग आणि ताओ-चेंग हे दोनच मित्र फाहियानबरोबर भारतात आले होते. बाकीचे वाटेतील हालअपेष्टांनी कंटाळून, थकून चीनला परत गेले होते.

त्यानंतर तेथून तो पश्चिमेकडे सोळा योजने अंतरावरील नगर देशाला पोचला. तेथे एक भव्य विहार होता आणि त्याच्या खाली गौतमबुद्धाच्या कपाळाच्या अस्थि पुरलेल्या होत्या, असा त्याने उल्लेख केलेला आहे. अनेक ठिकाणचे राजे येथे येऊन पूजा करीत असत आणि त्यांनी गौतम-बुद्धाच्या अस्थी कोणी घेऊन जाऊ नये म्हणून त्यांच्या रक्षणाचीही व्यवस्था केलेली होती, असे फाहियान लिहितो. या देशातील राजधानी-मध्ये देखील एक स्तूप होता; आणि तो बुद्धाच्या एका दातावर बांधलेला होता. त्यामुळे बौद्ध लोकांच्या दृष्टीने हे एक पवित्र तीर्थस्थान बनलेले होते.

यानंतर केलेल्या बिकट प्रवासामध्ये हुई-चिंग हा मृत्यू पावला. त्याच्या मरणाने फाहियानला दु:ख झाले, पण ते आवरून तो पंजाबमधील विविध ठिकाणची यात्रा करीत करीत मथुरेला पोचला. तेथे यमुना नदीच्या काठी वीस मठ बांधलेले होते, आणि त्यांमधून सुमारे ३००० बौद्ध भिक्षू राहात होते. भारतीय राजे या भिक्षूंचा आदर करीत असत. ते आपल्या कुटुंबियांसमवेत किंवा सचिवांच्याबरोबर भिक्षूंच्या दर्शनासाठी जात असत. त्यांचे दर्शन घेताना हे राजे आपल्या डोक्यावरील पगडी अथवा शिरोभूषण उतरून ठेवीत असत. तसेच ते त्यावेळी जमिनीवर अंथरलेल्या सतरंजीवर बसत असत. तेथील श्रमणांना भोजन घालीत असत आणि त्यांना भरपूर दक्षिणाही देत असत.

मथुरेनंतर फाहियान मध्यदेशात गेला होता. त्याने या भागाची सर्वांत अधिक प्रशंसा केलेली आहे. त्यावेळी हा प्रदेश ‘ब्राह्मणदेश’ म्हणून ओळखला जात होता. फाहियानच्या दृष्टीने येथील रहिवासी समृद्ध आणि

सुखी होते. मध्यदेशात तो प्रथम सांकाश्य येथे गेला. हे स्थान बौद्धधर्माचे एक पवित्र तीर्थ म्हणून मानले जात असे. भारतीय परंपरेनुसार भगवान बुद्ध आपल्या मातेला भेटण्यासाठी येथे आले होते. या ठिकाणी अशोकाने बांधलेला एक मठ आणि ६० फूट उंचीचा एक स्तंभ होता. या स्तंभाच्या शीर्षस्थानी एक सिंह-प्रतिमा बनविलेली होती. या ठिकाणी आणखीही काही मठ होते आणि त्यामधून हीनयान आणि महायान अशा दोन्ही पंथांचे अनुयायी-भिक्षू राहात होते. त्यांच्या अध्ययनशीलतेचा प्रभाव फाहियानवर खूपच पडला होता. तो लिहितो की, “ हा प्रदेश उपजाऊ होता आणि त्यामुळे येथील रहिवासी संपन्न होते. एखादा परदेशी माणूस जर त्यांच्या घरी गेला, तर ते त्याचे भोजन, वस्त्र इत्यादी देऊन स्वागत करीत असत. आणि त्याच्या गरजाही पूर्ण करीत असत. ”

तेथून तो दक्षिण-पूर्वदिशेला सात योजने प्रवास करून कान्यकुब्ज नगरीला पोचला. ही नगरी गंगेच्या काठी वसलेली होती. तिथे दोन मठ होते, आणि त्यांत हीनयान पंथाचे लोक राहात होते. तेथून तीन योजने अंतरावरील साकेत या ठिकाणी फाहियान गेला. साकेतपासून आठ योजने अंतरावर श्रावस्ती हे नगर वसलेले होते. फाहियानने तेथील नागरिकांची दानपरायणता आणि अतिथि-सत्कार यांची मुक्त कंठाने प्रशंसा केलेली आहे. या नगरात दानगृहे बांधलेली होती, आणि तिथे यात्रिकांना आणि साधू-संन्याशांना निःशुल्क भोजन आणि वस्त्र मिळत असे. तेथे इतर धर्माचे अनुयायीदेखील होते, असे त्याने म्हटले आहे. फाहियानच्या वेळी हे नगर उजाड बनले होते आणि तेथील नीरवता पाहून त्याला दुःखही झाले. काही मठ आणि स्तूप तेथे होते. तेथील जेतवनाचा उल्लेखही त्याने केला आहे. सुदत्त राजाने जेवढ्या सुवर्णमुद्रा या उपवनात अंथरता येतील तेवढे मूल्य देऊन जेतवन खरेदी केले होते. त्यामुळेच फाहियानने त्याला ‘ सुवर्ण-उपवन ’ म्हटले आहे. सुदत्त राजाने बांधलेला विहार त्यावेळी

तेथे होता. देवदत्त अथवा काश्यप, करकुच्छन्द आणि कनकमुनी आदी बुद्धाच्या पूर्वजीवनाशी संबंधित असलेल्या व्यक्तींचा व स्थानांचा उल्लेख त्याने केलेला आहे.

श्रावस्तीला भेट दिल्यानंतर फाहियान कपिलवस्तूला गेला. त्या काळापर्यंत कपिलवस्तू नगरी बरीच उध्वस्त होऊन गेलेली होती. तेथे थोडेच लोक राहात होते. जंगली श्वापदांच्या आक्रमणाचा धोकाही होता. तेथून तो कुशी नगर अथवा वैशाली येथे गेला आणि तेथून पाटलीपुत्र नगरीत पोचला. ' भारतामधील सर्वश्रेष्ठ नगर ' असा त्याने पाटलीपुत्राचा उल्लेख केलेला आहे. सम्राट अशोकाने बांधलेले राजप्रासाद त्यावेळी तिथे अस्तित्वात होते. ते पाहून फाहियानला आश्चर्य वाटले. त्याला असा भास झाला की, जणू काही देवांनीच हे निर्मिलेले आहेत ! त्यांच्या भिंती आणि खांब पाषाणाचे होते आणि त्यावर आकर्षक असे सुंदर नक्षीकाम केलेले होते. त्या नगरीतील नागरिक धनधान्याने संपन्न आणि उन्नतशील होते. अतिथिसत्कार करण्यामध्ये ते एकमेकांशी स्पर्धा करीत असत. या नगरीत महायान आणि हीनयान पंथांचे दोन मठ होते. महायान मठाचा सर्वांत प्रसिद्ध आचार्य रैवत या नावाचा होता. तो महापंडित आणि उदार होता. नागरिक त्याचा सर्वांत अधिक आदर करीत असत. आपली विद्वत्ता आणि शुद्ध आचरण यामुळे पूजनीय असलेला मंजुश्री नावाचा दुसरा एक बौद्ध आचार्य या मठात राहात होता. फाहियानने पाटलीपुत्र नगरीत अशोकाने बांधलेला एक स्तूप आणि दोन लोहस्तंभ पाहिले होते. त्यावर लेख कोरलेले होते आणि त्यांच्या शीर्षस्थानावर सिंह-प्रतिमा बनविलेल्या होत्या. ताओ-चेंग नावाचा त्याचा सहप्रवासी त्याच्याबरोबर पाटलीपुत्रापर्यंत आलेला होता. मध्यप्रदेशातील धार्मिक वातावरणाने तो फारच प्रभावीत झाला, आणि या नगरीतच थांबला. आपले उरलेले आयुष्य त्याने भारतातच व्यतीत केले. फाहियानला बौद्धधर्मासंबंधीची

संकलित सामुग्री घेऊन चीनमध्ये परत जायचे होते, म्हणून त्याने तेथेच ताओ-चेंग या आपल्या मित्राचा निरोप घेतला आणि पुढच्या यात्रेला प्रारंभ केला.

तो नालंदा येथे गेला. त्या ठिकाणी गौतमबुद्धाचा प्रिय शिष्य सारीपुत्त याचा जन्म झाला होता. त्याचा मृत्यूही त्याच ठिकाणी झाला होता. त्याच्या अस्थींवर बांधलेला एक स्तूप तेथे होता. फाहियानने या स्तूपाचा उल्लेख केलेला असून, तो गेला त्यावेळी तेथे आसपास लहानसे गावच वसलेले होते. मोठे नगर नव्हते. तेथून तो राजगृह येथे पोचला. तेथे दोन मठ असल्याचा उल्लेख त्याने केला आहे. या नगराच्या पश्चिमद्वारी अजातशत्रू राजाने बांधलेला एक सुंदर स्तूप होता. गृध्रकूट–श्रृंग या स्थानाचाही फाहियानने उल्लेख केलेला आहे. गौतमबुद्ध आणि त्याचा शिष्य आनंद हे या ठिकाणी होते. ते स्थान पाहून, बोधिगयेचे दर्शन घेऊन, तो परत पाटलीपुत्र नगरीला आला. मग तो वाराणसीला गेला. त्याने मृगशिखावन म्हणजेच सारनाथचा उल्लेख केला आहे. तेथे दोन मठ होते; ते सर्व पाहून फाहियान परत पाटलीपुत्र नगरीला आला. येथे त्याने आपले भारत–भ्रमण संपवून काही दिवसांनंतर परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. चंपावरून तो बंगालच्या समुद्रकिनाऱ्यावरील ताम्रलिप्ति बंदरात आला. तेथे तो दोन वर्षे थांबला होता. तेथील धार्मिक वातावरणाचा त्याच्यावर खूपच प्रभाव पडला होता असे आढळते. तेथे चोवीस मठ अस्तित्वात होते. त्यानंतर फाहियान चीनकडे गेला.

फाहियानने आपल्या प्रवास वर्णनात तत्कालीन भारतीय सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्य याची बरीच प्रशंसा केलेली आहे. तो म्हणतो की, " हा सम्राट ब्राह्मण धर्माचा अनुयायी होता. त्याच्या राज्यातील नागरिक त्याच्याप्रमाणे दयाळू आणि धार्मिक होते. त्याच्याकाळी प्रजेला कसलेही दु:ख अथवा कष्ट पडले नव्हते. त्याचप्रमाणे दुर्भिक्ष्य, क्रांती अथवा

अराजकता हे प्रकारही कधी झाले नव्हते. त्याची शासनव्यवस्था अत्यंत सुव्यवस्थित होती. लोक सुखी आणि संपन्न होते. त्यांना आपल्या संपत्तीच्या विषयी कसलीही कायदेशीर लिखा-पढी करावी लागत नव्हती. लोकांचे न्यायालयाशी फारच कमी काम पडत असे. लोकांवरील कर फारच कमी होते. जे नागरिक राज्याची जमीन कसत होते, त्यांना आपल्या उत्पन्नाचा काही हिस्सा राज्याला द्यावा लागत असे. प्रजेला भरपूर स्वातंत्र्य होते, अपराध्यांना शारीरिक दंड अथवा मृत्यूदंड अशा शिक्षा दिल्या जात नसत. गुन्हेगाराकडून बहुधा अर्थदंड वसूल करूनच त्यांना सोडून दिले जात असे. सम्राटांच्या विरुद्ध कट रचणाऱ्या गुन्हेगाराचा फक्त उजवा हात तोडला जात असे. त्याला मृत्यूदंडाची शिक्षा दिली जात नसे."

फाहियानच्या या वर्णनावरून असे स्पष्ट दिसते की, त्यावेळी भारतवर्षात दंडविधान फारच सरळ व साधे होते. फाहियानने भारतीय समाजाचीदेखील मुक्तकंठाने प्रशंसा केलेली आहे. त्याच्या मतानुसार या देशातील लोक फारच अतिथिपरायण होते. जेव्हा एखादा अतिथि त्यांच्या घरी येत असे, तेव्हा ते अत्यंत मोकळ्या मनाने त्याचे स्वागत करीत असत. त्याचे भोजन आणि विश्रांती आदी व्यवस्थाही करण्यात ते चुकत नसत. धार्मिक कृत्ये आणि दयाळूपणा याविषयी त्यांच्यात स्पर्धा चाले. सगळ्या देशात कोणी जीवहत्त्या करीत नसे. लोक लसूण, कांदा, मांस, मच्छी आणि मदिरा इत्यादींविषयी घृणा बाळगीत असत. त्याच्या मतानुसार फक्त चांडाळच केवळ मांसभक्षण करीत असत. त्यांच्या क्रूर–वृत्तीमुळे त्यांना अस्पृश्य मानले जात असे. त्यांना गावाच्या बाहेर रहावे लागत असे. गावात प्रवेश करताना गळ्यात ढोल बांधून तो वाजवीत त्यांना यावे लागत असे. ढोलाच्या आवाजामुळे त्यांच्या आगमनाची सूचना स्पृश्य लोकांना मिळत असे आणि ते त्यांचा स्पर्श

किंवा विटाळ होऊ नये म्हणून काळजी घेत असत. लोक डुक्कर अथवा कोंबड्या पाळीत नसत. जिवंत पशूंची विक्री करीत नसत. बाजारा-मध्ये कोठेही कसाईखाना किंवा मदिरागृह नव्हते. फक्त चांडाळ लोकच मासे मारीत असत आणि जनावरांची शिकार करीत असत. बाकीच्या लोकांचे जीवन आणि व्यवसाय फारच पवित्र होते. फाहियानने वैश्यांची फारच प्रशंसा केलेली आहे. मथुरेतील वैश्यासंबंधी तो लिहितो की, " ते अत्यंत धार्मिक प्रकृतीचे होते. त्यांनी बौद्ध भिक्षूंच्या सोयीसाठी मठ बांधलेले होते. या विहारांची आर्थिक गरज भागावी म्हणून त्यांनी भूमीचे दान केलेले होते. मठांच्या भिंतीवरील ताम्रपत्रात दानशूर वैश्यांची नावे कोरलेली होती. अशाप्रकारे कित्येक पिढ्यांतील लोकांपर्यंत या दानाची स्मृती राहाते. कोणीही सम्राट दानाची पद्धत बंद करू शकत नव्हता. पाटलीपुत्र येथेही तेथील प्रमुख वैश्यांनी नगरीत औषधालये आणि दानगृहे बांधलेली होती. त्यांमधून दरिद्री, निराश्रित, असहाय्य, विधवा, निस्सन्तान, लुळे, लंगडे आणि रोगी लोकांना भोजन, वस्त्र आणि औषधपाणी मोफत मिळत असे. अशा औषधालयांमधून निपुण असे रोग-चिकित्सक असत. ते रोगाची परीक्षा केल्यानंतर रोग्याला योग्य तो औषधोपचार करीत असत. तेथे रोग्यांच्या राहाण्याचीही व्यवस्था होती. रोगी पूर्ण बरा झाल्यानंतरच त्याला तेथून जाता येत असे."

त्या काळातील आर्थिक परिस्थितीबद्दलही फाहियानने लिहिलेले आहे. तो लिहितो की, खरेदी-विक्रीच्या व्यवहारात, बाजारात कवड्यांचा उप-योग केला जात असे. पाटलीपुत्राच्या बाजारात लहान लहान वस्तूंच्या खरेदी-विक्रीसाठी कवड्या वापरीत असत. भारी वस्तू किंवा मोठा व्यापार यांच्या देवघेवीसाठी नाणी आणि मुद्रा यांचा उपयोग केला जाई. फाहि-यानच्या मते त्यावेळी भारतातील व्यापार भरभराटलेला होता. २०० व्यक्ती एकावेळी बसू शकतील अशी मोठी जहाजे त्यावेळी तयार कर-

ण्यात येत असत. अशाच एका मोठ्या जहाजात बसून ताम्रलिप्ति बंदरापासून त्याने चीनकडे प्रस्थान केले होते. त्या मोठ्या जहाजाबरोबर अनेक लहान-लहान नावा होत्या. मार्गात भयंकर वादळाशी सामना करावा लागला तरी ते जहाज उलटले नव्हते.

फाहियानच्या मतानुसार येथील सम्राट विद्वानांचा संरक्षक होता. त्याकाळी पाटलीपुत्र नगरीमध्ये महायान पंथाचा एक आचार्य राहात होता. तो एक कुशाग्र आणि प्रखर बुद्धीचा विद्वान होता. सम्राट त्याचा आदर करीत असे. तो त्या आचार्याकडे त्याच्या दर्शनासाठी जात असे. अशा वेळी तो आचार्यापेक्षा कमी उंचीच्या स्थानावर बसत असे. जर चुकून आचार्याच्या शरीराला स्पर्श झाला, तर तो तत्काळ धुऊन टाकण्यात येई. आचार्यांकडे अध्ययनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यांतून लोक येत असत. फाहियानने पाटलीपुत्रातील मंजुश्री नावाच्या दुसऱ्या एका विद्वानाचा उल्लेख केलेलाच आहे. सम्राट यालाही आदरपूर्वक प्रोत्साहन देत, असे त्याने म्हटले आहे.


फाहियानने लिहिले आहे की, “ भारतामध्ये विविध प्रकारचे धार्मिक विचारप्रवाह विद्यमान होते. त्या सर्वांचा परलोकावर विश्वास होता.” त्याने भारतीय श्रमणांची मोठी प्रशंसा केलेली आहे मथुरेतील श्रमणांसंबंधी लिहिताना त्याने लिहिले आहे की, ते धार्मिक गुणांनी युक्त होते आणि प्रतिदिन सूत्रांचा पाठ आणि ध्यान-धारणा करीत असत. एखादा नवीन भिक्षू त्याच्याकडे जात असे, तेव्हा जेवणखाण आणि वस्त्र आदी देऊन ते त्याचा आदरसत्कार करीत असत. अन्य नगरांतून रहाणाऱ्या भिक्षूंची रहाणीदेखील आदर्शपूर्ण होती. आसपासच्या गावातील लोक त्यांना जेवणखाण आणि वस्त्र इत्यादी देत असत. ज्या विहाराचा प्रत्यक्ष गौतमबुद्धाच्या जीवनाशी संबंध होता, त्याविषयी लोकांना आदर वाटत असे. उदाहरणार्थ जेतवनातील विहाराला दान देण्याविषयी

भारतीय राजांमध्ये स्पर्धा चालत असे. तेथे रात्रीच्या वेळी इतक्या मोठ्या संख्येने दीप लावले जात असत की, त्या परिसरात दिवसासारखा प्रकाश पडत असे.

फाहियानने लिहिले आहे की, भारतामधील लोक उत्सव आणि समारंभप्रिय आहेत. ते वैशाख अष्टमीच्या दिवशी एक विशेष प्रकारचा उत्सव साजरा करीत असत. त्यावेळी ते देवांच्या मूर्तींची मिरवणूक काढीत असत. चार चाकांच्या रथावर बांबू बांधून पाच मजल्यांचा एक सांगाडा तयार करीत असत. त्याच्या मध्यभागी वीस हात उंचीचा लाकडी कळस बसविला जात असे. त्यावर निरनिराळ्या रंगांनी सुसज्जित अशी रेशमी वस्त्रे चढविली जात असत. अशा प्रकारे तयार केलेला आकार एखाद्या स्तूपाप्रमाणेच दिसत असे. रथावर सोन्या–चांदीनी जडवलेल्या देवांच्या प्रतिमा ठेवल्या जात असत. बाहेर चारी बाजूंना बुद्ध आणि बोधिसत्त्वाच्या प्रतिमा ठेवल्या जात असत. अशाप्रकारे एकूण वीस रथ तयार केलेले असत. त्यांची सजावट प्रेक्षणीय असे. प्रतिमांच्या या मिरवणुकीमध्ये साधू-संत आणि गृहस्थ असे सर्व लोक सामील होत असत. मिरवणुकीत गायक–वादकही असत. ही मिरवणूक नगरातील प्रत्येक भागात मिरवत असे. त्यात दोन रात्री जात असत. अशा वेळी सुंदर रोषणाईने नगर झगमगून जात असे. भारतातील प्रत्येक भागात हा उत्सव मोठ्या समारंभाने आणि उत्साहाने साजरा केला जात असे.

फाहियानच्या या वर्णनावरून हे स्पष्ट होते की, चंद्रगुप्त विक्रमादित्याचा कालखंड हा शांती आणि ऐश्वर्य यांनी समृद्ध होता. या काळात कला आणि साहित्य यांचाही विकास झाला होता. गुप्तवंशातील विक्रमादित्य हा सर्वांत मोठा आणि विजयी सम्राट होता. इ. स. ४१५ मध्ये चंद्रगुप्त विक्रमादित्याचा कालखंड समाप्त झाला.

□



# कविकुलगुरू कालिदास

चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या काळात साहित्य आणि कला या क्षेत्रातही बरीच प्रगती झाली होती. विक्रमादित्य हा महान पराक्रमी विजेता आणि कुशल शासक होता, इतकेच नव्हे तर तो विद्याप्रेमी, रसिक आणि कवी-साहित्यिक, विद्वान यांचा चाहता व पुरस्कर्ताही होता. त्याच्या दरबारात विविध क्षेत्रातील गुणी प्रतिभावान विद्वान होते आणि धन्वंतरी, क्षपणक, शंकू, अमरसिंह, घटखर्पर, वेतालभट्ट, वराहमिहिर, वररुची आणि कालिदास अशी कीर्तीवंत नवरत्ने होती, अशी आख्यायिका आहे. वरील विद्वानांच्या कालखंडाविषयी इतिहासात मतभिन्नता दिसून येते. त्यामुळे हे सर्व विद्वान विक्रमादित्याच्या दरबारात असतीलच असे खात्रीपूर्वक सांगता येत नाही. तथापि, त्याने अशा कलावंत, प्रतिभावंत व विद्वान लोकांना राजाश्रय दिलेला होता. लोकरंजन हे त्याने आपले ब्रीद मानलेले होते.

त्यानंतर कालिदास स्वैरपणे वागू लागला. एकदा कुमारदास नावाच्या आपल्या मित्राला भेटण्यासाठी तो सिंहलद्वीपात गेला असता तिथल्या एका गणिकेकडून त्याला समजले की, 'कमले कमलोत्पत्तिः श्रूयते न तु दृश्यते'—एका कमलावरच दुसऱ्या कमलाची उत्पत्ती होते, असे ऐकले आहे; पण कधी पाहिले नाही, या श्लोकार्धाची पूर्ती करणाऱ्याला राजाने मोठे बक्षीस जाहीर केले आहे. कालिदासाने लगेच पुढील श्लोकार्ध रचून ती समस्यापूर्ती केली—'बाले तव मुखाम्भोजात् कथमिन्दीवरद्वयम्'—तुझ्या मुखकमलावर दोन (नेत्ररूपी) निळी कमळे दिसतात हे कसे? त्यावर ती गणिका आश्चर्यचकित झाली. समस्यापूर्तीचे बक्षीस आपल्यालाच मिळावे म्हणून तिने कालिदासाचा खून करविला. पण तो गुन्हा उघडकीस आला. कुमारदासाला हे समजताच मित्रप्रेमामुळे त्याने कालिदासाच्या चितेवर स्वतःला जाळून घेतले.

कालिदासासंबंधी दुसरीही एक आख्यायिका अशी सांगितली जाते :

कालिदासाचा जन्म एका गरीब कुटुंबामध्ये झाला होता. त्याला कसलेही शिक्षण अथवा संस्कार मिळालेले नव्हते. एकदा तो जंगलात गेला होता, आणि तिथल्या एका झाडाच्या फांदीवर बसून तीच फांदी हातातल्या कुऱ्हाडीने तोडीत होता. त्याच वेळी तेथून काही पंडित चालले होते. जवळच्याच एका विद्योत्तमा नावाच्या एका विद्वान राजकुमारीने या पंडितांना शास्त्रार्थाच्या वादविवादामध्ये हरविलेले होते. निराश होऊन चाललेल्या त्या पंडितांना फांदीवरचा हा मूर्ख पाहून असे वाटले की, यालाच घेऊन त्या राजकुमारीकडे जावे म्हणजे तो तिला चांगली अद्दल घडवील. त्यांनी कालिदासाला झाडावरून खाली उतरण्यास सांगितले आणि जसे आपण सांगू तसे केले तर तुला बरेच द्रव्य देऊ अशी लालूचही दाखविली. कालिदासाने, जसे तुम्ही सांगाल तसे मी वागेन, असे त्या पंडितांना कबूल केले. पंडितांनी त्याला सांगितले की, या

जवळच्या नगरीत पोचल्यानंतर तू आपले तोंड बंद करून ध्यायचे. सगळ्या गोष्टी खुणेने करावयाच्या.

नगरात पोचल्यावर त्या पंडिताने कालिदासाला विद्योत्तमा राजकुमारीच्या पुढे नेले आणि सांगितले की, "हा मोठा विद्वान पुरुष आहे. पण याने मौन धारण केलेले आहे. म्हणून हा खुणेनेच आपल्या प्रश्नांची उत्तरे देईल."

विद्योत्तमेने आपले एक बोट कालिदासाला दाखविले. त्याचा अर्थ होता की, ईश्वर एक आहे. पण कालिदासाला वाटले की, ती एक बोट दाखवून आपला डोळा फोडू इच्छिते. कालिदासाने तावडतोब आपली दोन बोटे दाखविली. त्याचा अर्थ असा होता की, मी दोन डोळे फोडीन. परंतु पंडितांनी त्याचा अर्थ असा केला की, ईश्वर एकच आहे, पण निर्गुण आणि सगुण अशी त्याची दोन रूपे आहेत.

त्यानंतर विद्योत्तमेने आपली पाच बोटे दाखविली. त्याचा अर्थ होता की, या विश्वात पाच तत्त्वे आहेत. पण कालिदासाला वाटले की, ती त्याला थप्पड मारण्यासाठी पाच बोटे उगारून दाखवीत आहे. म्हणून त्याने रागारागाने आपली मूठ वळवून दाखविली. पंडितांनी त्याचा अर्थ असा केला की, विश्वात जरी पाच तत्त्वे असली तरी ती सगळी एकवटल्यानंतरच विश्वाची उत्पत्ती होते.

कालिदासाची ही विद्वत्ता पाहून राजकुमारीने आपला पराभव मान्य केला आणि त्याच्याशी लग्न केले; कारण जो आपला पराभव करील त्याच्याशी लग्न करीन, अशी तिची अट होती.

रात्र झाली. कालिदास आणि विद्योत्तमा बसले होते; त्याच वेळी घराच्या बाहेर एका उंटाचे शब्द त्यांच्या कानी पडले. विद्योत्तमेने विचारले की, 'हा कोणत्या पशूचा आवाज आहे?'

कालिदासाने उत्तर दिले, 'उट्र, उट्र' म्हणजे उंट, उंट.

उंटाला संस्कृतमध्ये ‘ उष्ट्र ’ असा शब्द आहे. कालिदास त्याऐवजी उट्र म्हणत होता. त्यावरून कालिदासाचे अज्ञान तिच्या लक्षात आले आणि त्या पंडितांनी आपल्याला कसे फसविले आहे हेही तिला समजले. तिने कालिदासाला घराच्या बाहेर काढले आणि सांगितले की, ‘ जोवर तू माझ्यापेक्षा अधिक विद्वान होत नाहीस तोवर तू येथे पाऊलही टाकू नकोस. ’

कालिदासाला हा अपमान सहन झाला नाही. तो कालीच्या मंदिरात आला आणि तिथे त्याने कठोर तपस्या आरंभिली. त्याच्या तपस्येने प्रसन्न होऊन कालीने त्याला विद्येचे वरदान दिले. तेव्हापासूनच त्याने आपले नाव कालिदास ठेवले. विद्यालाभ होताच कालिदास परत आला, तेव्हा विद्योत्तमेने त्याचे मोठे स्वागत केले.

या आख्यायिकांमध्ये तसे काही तथ्य नाही. त्यातील मतितार्थ एवढाच की, तो बराच परिश्रमी होता. आणि त्याने मोठ्या कष्टाने विद्या मिळविली होती. श्रुती, स्मृती, इतिहास, पुराणे, सांख्य, योग, वेदान्त, ज्योतिःशास्त्र, कामशास्त्र, वैद्यक, व्याकरण, अर्थशास्त्र, संगीत, चित्रकला इत्यादी शास्त्रांचा आणि कलांचा कालिदास जाणकार होता. युद्धे, तह, राजशासन, राजदरबार आणि धनिक-लोक यांची त्याला खूपच माहिती होती. विद्या व विद्यागुरु यांच्याबद्दल त्याला नितान्त आदर होता. त्याच्या नैसर्गिक प्रतिभेला शास्त्राभ्यासाची, कलापरिचयाची आणि सूक्ष्म अवलोकनाची जोड मिळाली होती. त्याची वृत्ती शृंगारात विशेष रमत असे. तरी तो स्वैराचारी नसावा. गृहस्थाश्रम आणि एकनिष्ठ पत्नीप्रेम यांचा त्याने अनेक ठिकाणी गौरव केला आहे. तो मोठा विनोदी, विनय-संपन्न, निरलस आणि वत्सल असावा. त्याचे आयुष्य थोरामोठयांच्या सहवासात आणि संपन्न अवस्थेत गेले होते. जीवनातील सर्व सुखांचा व कीर्तीचा कालिदासाने पूर्ण उपभोग घेतला होता. भावकवी, महाकवी

व नाटककार या तीनही भूमिका कालिदासाने सारख्याच यशस्वीपणाने वठविलेल्या आहेत. ऋतुसंहार हे निसर्गवर्णनपर काव्य, मेघदूत हे खंड-काव्य, कुमारसंभव व रघुवंश ही दोन महाकाव्ये आणि मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय व शाकुंतल ही नाटके या त्याच्या कलाकृती प्रसिद्ध आहेत. 'रघुवंश' हे कालिदासाचे सर्वोत्कृष्ट महाकाव्य मानले जाते. या काव्यामुळेच त्याला 'कविकुलगुरू' असे गौरवाने म्हटले जाते.

कालिदासाच्या काव्यात विविध प्रकारच्या उपमांची एक सृष्टीच त्याने उभारलेली आहे. तो खरोखरीच उपमासम्राट होता, म्हणून 'उपमा-कालिदासस्य' अशी एक उक्तीच निर्माण झाली. त्याच्या एका उपमे-मुळे तर कालिदासाला 'दीपशिखा कालिदास' असेच नाव मिळाले आहे. ज्या श्लोकामध्ये ही उपमा आहे तो श्लोक रघुवंशातील इंदुमतीच्या स्वयंवरवर्णनाचा आहे. कालिदासाने लिहिले आहे –

संचारिणी दीपशिखेव रात्रौ
यं यं व्यतीयाय पतिंवरा सा ॥
नरेन्द्रमार्गाट्ट इव प्रपेदे
विवर्णभावं स स भूमिपालः ॥

—रात्रौ फिरणाऱ्या दीपज्योतीप्रमाणे ती पतीची निवड करण्यास निघालेली इंदुमती ज्या ज्या राजाला टाकून पुढे गेली, तो तो राजा राजरस्त्यावरील महालाप्रमाणे काळाठिक्कर पडला.

कालिदास हा भारतीय संस्कृतीचा प्रातिनिधिक कवी आहे. त्याच्या काव्यातला समाज श्रुतिस्मृतिप्रादि नियमांना अनुसरणारा आहे. त्यागासाठी धनसंपदा, सत्यासाठी मितभाषण, यशासाठी जिगिषा आणि कुलपरंपरेचे सातत्य टिकविण्यासाठी संतती अपेक्षिणारा असा तो समाज आहे. या समाजाला त्याने अनेक ठिकाणी दिव्य जीवनाविषयीचे संदेश जाता जाता देऊन ठेवले आहेत. कालिदासाची प्रत्येक कृती त्यागप्रधान प्रेमाची

जनिष्ठा सांगणारी आहे. त्याग व तपस्या यांच्याशिवाय कोणतीच गोष्ट उज्ज्वल होऊ शकत नाही, असाच जणू कालिदासाचा संदेश आहे. जीवनाची ध्येयभूत, पण कठोर अध्यात्मिकता त्याने काव्याच्या मखरात बसवून आस्वादनीय आणि विलोभनीय केली आहे.

कालिदासाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती त्याच्या काव्यात जागोजाग प्रत्ययाला येते. निसर्गाचे अवलोकन करून त्यातील मार्मिक अंश ग्रहण करणे हे त्याचे वैशिष्ट्य आहे. मानव आणि निसर्ग हे जणू त्याच्या काव्यात एकात्म होऊन पुढे येतात. कालिदासाची प्रतिभा सर्वतोमुखी आहे. त्याची रसाभिरंजक शैली साहित्याचार्यांनी आदर्शभूत ठरविली असून तिला वैदर्भीरीती असे नाव दिले आहे.

वैदर्भी कविता स्वयं वृतवती श्रीकालिदासं वरम्।

—वैदर्भी कवितेने कालिदास या वराला स्वतः होऊन वरले आहे, असे त्याच्या शैलीविषयी म्हटलेले आहे. भारतीय इतिहासात अनेक राजे आले आणि गेले, पण कालिदासाचे नाव आणि स्थान हे अभंग आहे.

□

# वैभवशाली काल

विक्रमादित्याच्या काळातच नागार्जुन नावाचा एक विद्वान रसचिकित्सक होऊन गेला. याने रसचिकित्सा नावाच्या एका नव्या पद्धतीचा शोध लावला होता. त्याने धातूंच्या द्वारा रोगनिदान करण्याची पद्धती शोधली होती. आयुर्वेद आणि रसायन या क्षेत्रात या काळात बरीच प्रगती झालेली होती. धन्वन्तरी नावाचा प्रसिद्ध वैद्य याच काळात होऊन गेला, असे मानले जाते.

धातू-विज्ञान या क्षेत्रातल्या प्रगतीचा प्रत्यक्ष पुरावा दिल्लीजवळील महरवली लोहस्तंभावरून मिळू शकतो. हा लोहस्तंभ २४ फूट उंच आणि १८० मण वजनाचा आहे. अशा प्रकारचा हा लोहस्तंभ बनविण्यातकी या क्षेत्रात प्रगती झालेली होती. सुमारे १६०० वर्षे होऊन गेली तरी देखील उघड्यावर असलेल्या या लोहस्तंभावर ऊन, वारा, पाऊस यांचा काहीही परिणाम झालेला नाही. त्यावर थोडाही गंज चढलेला

नाही. हा स्तंभ चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीतच बनविण्यात आला, असे काही विद्वानांचे मत आहे.

याशिवाय ज्योतिष, गणित, धर्म आणि तत्त्वज्ञान इत्यादी विविध क्षेत्रांमध्येदेखील बरीच प्रगती या काळात झालेली होती.

चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या कारकीर्दीसंबंधी 'जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन' या ग्रंथात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आपली कन्या इंदिरा हिला लिहिलेल्या एका पत्रात सांगितले आहे की, "हा दुसरा चंद्रगुप्त महत्त्वाकांक्षी आणि कर्तबगार होता. उत्तरेकडील इतर आर्य राजे आपल्याकडे वळवून घ्यावयाचे आणि त्या सर्वांचे मिळून एक प्रकारचे संयुक्त राज्य स्थापन करावयाचे या उद्योगाला त्याने सुरुवात केली. अत्यंत प्रसिद्ध आणि प्रबळ अशा लिच्छवी वंशातील कुमारीदेवीशी त्याने विवाह केला आणि अशा रीतीने या वंशाच्या लोकांचा पाठिंबा मिळविला. प्राथमिक तयारी सावधानपणे पुरी करून जमीन तयार झाली असे दिसल्यावर त्याने हिंदुस्थानातील परकी राज्यकर्त्यांविरुद्ध 'धर्मयुद्ध' पुकारले. सर्व क्षत्रिय आणि आर्यांमधील वरिष्ठ वर्ग यांची सत्ता आणि अधिकारस्थाने या परकीयांच्यामुळे नाहीशी झालेली होती. तेव्हा ते सर्व लढाईच्या पाठीशी होते. सुमारे बारा वर्षांच्या युद्धानंतर चंद्रगुप्ताच्या ताब्यात आज ज्याला आपण संयुक्त प्रांत म्हणतो ( उत्तर प्रदेश ) त्या प्रदेशासह उत्तर हिंदुस्थानचा काही भाग आला. आणि त्याने आपल्याला राजराजेश्वर अशी पदवी धारण करून राज्याभिषेक करवून घेतला.

"हूण लोकांनी येऊन त्रास द्यायला लागेपर्यंत गुप्तघराण्याचा अंमल चालू राहिला होता. काही अंशी हिंदुधर्म, हिंदुराष्ट्रवाद यांच्या आक्रमक प्रवृत्तीचा हा काळ होता. या काळात भारतवर्षात तुर्क, पार्थियन इत्यादी अनार्य असे जे परकी राजे होते त्या सर्वांना मुळासकट उखडून तलवारीच्या जोरावर बाहेर हाकलून देण्यात आले. अशा रीतीने वांशिक

शत्रुत्व उदयास येऊन ते लोकांच्या हालचालीवर परिणाम करू लागले असे दिसते. भारतीय आर्यांना आपल्या वंशाबद्दल अभिमान उत्पन्न झाला आणि बाकीच्या या लोकांना रानटी ( बर्बर ), अनार्य, म्लेंच्छ म्हणून ते तुच्छ मानू लागले. यामुळे गुप्तांनी जेव्हा भारतीय आर्य राजांना जिंकून त्यांची राज्ये पादाक्रांत केली, तेव्हा त्यांच्याशी त्यांनी नरमाईचे व गोडीचे धोरण ठेवले. परंतु अनार्यांच्या बाबतीत मात्र त्यांनी कसलीही सवलत दिली नाही. चंद्रगुप्ताचा मुलगा समुद्रगुप्त हा बापापेक्षाही अधिक आक्रमणशील योद्धा होता. तो श्रेष्ठ दर्जाचा सेनापती होता आणि सम्राट पदावर आल्यावर त्याने साऱ्या देशभर–दक्षिण हिंदुस्थानसुद्धा– विजयी स्वाऱ्या केल्या. गुप्तांच्या साम्राज्याचा विस्तार त्याने इतका वाढविला की, हिंदुस्थानचा बहुतेक भाग त्याने व्यापला. परंतु दक्षिणेतील राज्यावरचे त्याचे प्रभुत्व अर्थात नुसते नावालाच होते. उत्तरेस मात्र कुशाणांना त्याने सिंधु नदीच्या परतीरावर पिटाळून लावले होते.

"समुद्रगुप्ताचा मुलगा दुसरा चंद्रगुप्त हा राजाही मोठा योद्धा होता. पुष्कळ दिवसपर्यंत शक किंवा तुर्की राजांच्या अंमलाखाली असलेले काठेवाड आणि गुजरात हे प्रांत याने काबीज केले. याने आपल्याला विक्रमादित्य हे नाव घेतले व याच नावाने तो प्रसिद्ध आहे. परंतु हे नाव सीझरच्या नावाप्रमाणे पुढे पुष्कळशा राजांची एक पदवीच होऊन गेली. त्यामुळे निरनिराळ्या विक्रमादित्यांचा मोठा गोंधळ होतो.

'दिल्लीच्या कुतुबमिनारजवळ एक प्रचंड लोखंडी स्तंभ तू पाहिलेला आहेस. तो तुला आठवतो का? हा स्तंभ विक्रमादित्याने विजयस्तंभ म्हणून बांधला असे सांगतात. कलेच्या दृष्टीने त्याचे काम फार सुंदर केलेले आहे आणि त्याच्या शेंड्यावर विजयाचे चिन्ह म्हणून कमलपुष्प बसविलेले आहे."

गुप्तांचा काळ हा हिंदुस्थानातील हिंदू-साम्राज्यशाहीचा काळ

आहे. या काळात आर्य-संस्कृती, आर्यविद्या, यांचे फार मोठे पुनरुज्जीवन
झाले. हिंदी जीवन आणि संस्कृती यामध्ये ग्रीक किंवा कुशाण लोकांनी
काही काही हेलनिस्टिक म्हणजेच ग्रीक आणि मंगोलियन गोष्टींचा
अंतर्भाव केलेला होता, त्यांना या काळात उत्तेजन मिळणे तर दूरच,
परंतु उलट भारतीय आर्य परंपरेवर अधिक भर देऊन त्या प्रकारांना
उखडून काढण्याचे काम जाणून बुजून करण्यात आले. दरबारची भाषा
ही संस्कृत होती, पण या काळामध्येसुद्धा सामान्य लोकांची बोलण्याची
भाषा ही संस्कृत राहिली नव्हती. बोलण्याची भाषा ही संस्कृतशी
पुष्कळच निकट संबंध असलेली अशी एक प्राकृत भाषा होती.
अर्थात संस्कृत ही जरी त्यावेळी लोकभाषा नसली, तरी ती काही मृत
भाषा झालेली नव्हती. अद्यापी तिचा चांगलाच प्रसार होता. गुप्त
साम्राज्याच्या काळामध्ये संस्कृत काव्य व नाटक यांना फार मोठा
बहर आला आणि भारतीय कलांचीही मोठीच चलती झाली. वेदांच्या
आणि रामायण–महाभारतादि महाकाव्यांच्या काळानंतर संस्कृत वाङ्मयाच्या
इतिहासात हाच काळ बहुधा अत्यंत श्रेष्ठ व सुसंपन्न काळ असे म्हणता
येईल. आपल्या देशातील अत्यंत अलौकिक ग्रंथकार कालिदास हा या
काळामधलाच. विक्रमादित्याचा दरबार फारच वैभवशाली होता असे
म्हणतात. त्याच्या दरबारात तत्कालीन सर्वश्रेष्ठ ग्रंथकार आणि कलावंत
यांची बैठक असे.

दुसरा चंद्रगुप्त म्हणजेच विक्रमादित्य. याची कारकीर्द २३ वर्षे
झाली.

भारतीय सुवर्णयुगाचा हा काळ प्रत्येकाने अभिमान बाळगावा असाच
आहे.

क्र. दिनांक
BVBK-0402